
Downloaded from https:// www.studiestoday.com

मराठी

# बालभारती

इयत्ता चौथी



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com

शासन मंजुरी क्रमांक : प्राशिसं/२०१४-१५/६७११/मंजुरी/ड-५०५/२४४२ दिनांक : २४/४/२०१४

# मराठी

# बालभारती

## इयत्ता चौथी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

प्रथमावृत्ती : २०१४
तिसरे पुनर्मुद्रण : २०१७

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती :**

प्रा. रा. रं. बोराडे, अध्यक्ष
इरगोंडा पाटील, सदस्य
फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सदस्य
वाहरू सोनवणे, सदस्य
प्रा. प्रज्ञा दया पवार, सदस्य
डॉ. सुभाष सावरकर, सदस्य
किशोर दरक, सदस्य
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा समिती – कार्यगट सदस्य**

हरी गंगाधर नारलावार
प्रा. सर्जेराव रणखांब
श्रीमती रेणू दांडेकर
प्रा. जयवंत पाटील
डॉ. रोहिणी गायकवाड
डॉ. मंदा नांदूरकर
प्रा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो
प्रा. डॉ. सुनीता सुळेकर
प्राचार्य डॉ. गोविंद गायकी
डॉ. संध्या पवार
श्रीकांत चौगुले
पद्‌माकर कुलकर्णी
शिवा कांबळे
नीलेश निमकर
एकनाथ आव्हाड
अतुल कुलकर्णी
वेच्या रूध्या गावित

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

| | | |
|---|---|---|
| **संयोजन** | : | श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख<br>प्र. विशेषाधिकारी, मराठी |
| **चित्रकार** | : | विजयकुमार शिंदे |
| **मुखपृष्ठ** | : | सुहास जगताप |
| **अक्षरजुळणी** | : | भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| **निर्मिती** | : | सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी<br>सचिन मेहता, निर्मिती अधिकारी<br>नितीन वाणी, निर्मिती सहायक |
| **कागद** | : | ७० जी.एस.एम. मॅपलिथो |
| **मुद्रणादेश** | : | |
| **मुद्रक** | : | |

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्‌ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्‌धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# प्रस्तावना

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९' आणि 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२००५' डोळ्यांसमोर ठेवून राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम-२०१२' तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित मराठी विषयाची इयत्ता पहिली ते आठवीची नवीन बालभारती माला २०१३-१४ या शालेय वर्षापासून टप्प्याटप्प्याने पाठ्यपुस्तक मंडळ प्रकाशित करत आहे. या मालेतील इयत्ता चौथीचे हे पुस्तक आपल्या हाती देताना आनंद वाटतो.

घर व परिसरातून अनौपचारिकपणे मुलांची शब्दसंपत्ती विकसित झालेली आहे. इयत्ता चौथीमध्ये त्याला श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन ही भाषिक कौशल्ये अधिक चांगल्या प्रकारे अवगत करता यावीत, अशी अपेक्षा आहे. या अपेक्षेची पूर्तता करण्यासाठी सुलभ व रंजक असे पाठ, कविता आणि पूरक वाचनासाठी विविध साहित्य प्रकारांची निवड केलेली आहे. निवड करताना मुलांचे भावविश्व, अनुभव, परिसरातील घटना व प्रसंग यांचा विचार केला आहे. गाभाघटक, मूल्ये, जीवनकौशल्ये यांचा अंतर्भाव पाठांतील आशयात तसेच स्वाध्याय, भाषिक कृती, उपक्रम व प्रकल्पांत केलेला आहे.

विविध भाषिक कृतींच्या माध्यमातून शिकताना विद्यार्थी ज्ञानाची निर्मिती सहजतेने करू शकतील व यातूनच त्यांचा भाषिक विकासही साधता येईल. त्याबरोबरच पाठांच्या आशयाचा स्वतःशी व परिसराशी संबंध जोडणे, भाषाविकास साधणे यांसाठी नावीन्यपूर्ण स्वाध्यायांचा समावेश केला आहे. लेखन व अभिव्यक्ती विकासासाठी विद्यार्थ्यांना स्वतःची कल्पकता वापरून लेखन करता यावे, यासाठी चित्रमालिकेवरून तसेच मुद्द्यांवरून गोष्ट तयार करणे यांसारख्या अध्ययन-अनुभवांची योजना केलेली आहे. तसेच मनोरंजनासाठी विनोद, कोडी यांचाही समावेश केला आहे.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. हे पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष आणि दर्जेदार व्हावे, यासाठी राज्याच्या विविध भागांतील शिक्षक, भाषातज्ज्ञ व शिक्षणतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. त्यांच्या सूचना व अभिप्रायांचा विचार करून मराठी भाषा समितीने पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

मराठी भाषा समिती व कार्यगट सदस्य, संबंधित समीक्षक, तज्ज्ञ, चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(चं. रा. बोरकर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : ३१ मार्च २०१४
१० चैत्र, शके १९३६

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | धरतीची आम्ही लेकरं (कविता) | द. ना. गव्हाणकर | १ |
| २. | बोलणारी नदी | - | २ |
| | • आम्ही संवाद करतो | - | ७ |
| ३. | आम्हांलाही हवाय मोबाइल ! (नाट्यछटा) | सूर्यकांत सराफ | ८ |
| ४. | या भारतात... (कविता) | राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज | ९ |
| ५. | मला शिकायचंय ! | आबा गोविंदा महाजन | १० |
| | • आम्ही कथा लिहितो-१ | - | १४ |
| ६. | मायेची पाखर | पां. चिं. पाटील | १५ |
| ७. | धूळपेरणी (कविता) | अशोक कौतिक कोळी | १९ |
| ८. | गुणग्राहक राजा | बाबा भांड | २२ |
| | • आम्ही आमचे अनुभव लिहितो | - | २६ |
| ९. | ईदगाह | प्रेमचंद (अनुवाद - संजीवनी खेर) | २७ |
| | • आम्ही सहलीला जातो | - | ३१ |
| १०. | धाडसी हाली (मुलाखत) | - | ३३ |
| ११. | नाखवादादा, नाखवादादा... (कविता) | वसुधा पाटील | ३७ |
| | • आम्ही खेळ खेळतो | - | ३९ |
| १२. | वाटाड्या | शैलजा काळे | ४० |
| १३. | चवदार तळ्याचे पाणी (कविता) | अनुराधा साळवेकर | ४६ |
| १४. | मिठाचा शोध | अंजली अत्रे | ४९ |
| | • निमंत्रण पत्रिका | - | ५२ |
| १५. | आनंदाचं झाड | लीला शिंदे | ५४ |


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १६. | झुळूक मी व्हावे (कविता) | दा. अ. कारे | ५७ |
| १७. | म्हणींच्या गमती | - | ५९ |
| | • आम्ही कथा लिहितो-२ | - | ६२ |
| | • आम्ही लेखन करतो | - | ६४ |
| १८. | जननायक बिरसा मुंडा | - | ६५ |
| १९. | हें कोण गे आई ? (कविता) | भा. रा. तांबे | ६७ |
| | • आम्ही सूचना फलक वाचतो | - | ६९ |
| २०. | कोलाज | - | ७० |
| २१. | आभाळमाया (कविता) | विलास सिंदगीकर | ७३ |
| | • आम्ही चित्रवर्णन करतो | - | ७५ |
| २२. | होय, मीसुद्धा ! | राजीव तांबे | ७६ |
| २३. | मन्हा खान्देस्नी माटी (कविता) | शकुंतला भा. पाटील | ८० |
| | • आमचे गाव (नकाशा) | - | ८२ |
| | • आम्ही असेही बोलतो | - | ८३ |
| २४. | थोर हुतात्मे | - | ८४ |
| २५. | संतवाणी | संत तुकाराम | ८८ |
| | | संत चोखामेळा | |
| | | संत शेख महंमद | |


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १. धरतीची आम्ही लेकरं



• ऐका. म्हणा. वाचा.

धरतीची आम्ही लेकरं । भाग्यवान ।
धरतीची आम्ही लेकरं ।। ध्रु. ।।

शेतावर जाऊया । सांगाती गाऊया ।
रानीवनी गाती जशी रानपाखरं ।। १ ।।

मेहनत जिमनीवरी । केली वरीसभरी ।
आज आलं फळ त्याचं डुले शिवार ।। २ ।।

शाळु, जुंधळा मोती । चमचम चमकत्याती ।
मोत्यांची सालभरी खाऊ भाकर ।। ३ ।।

स्थापू समानता, पोलादी ऐक्यता ।
नाही धनी येथ कुणी, नाही चाकर ।। ४ ।।

धरतीची आम्ही लेकरं । भाग्यवान ।
धरतीची आम्ही लेकरं ।।

**– द. ना. गव्हाणकर**



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावी.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# २. बोलणारी नदी

एक होती मुलगी. तिचे नाव लीला. होती ती चौथीत अन् होती भारी खोडकर. लोकांना त्रास द्यावा असे तिला नाही वाटायचे, पण तिला खोड्या काढण्याची भारी हौस. स्वतःच्या मनात येईल ते करायची तिला इच्छा असायची. त्यासाठी मजेशीर युक्त्या शोधायची. तिचे घर होते गावाच्या एका टोकाला. तिच्या घराच्या मागील वावराच्या बाजूला थोडेसे चालत गेले की नदी होती.



एक दिवस लीलाला बर्फाचा गोळा खावासा वाटला. आई म्हणाली, ''नको खाऊ.'' ताई म्हणाली, ''नको खाऊ.'' माई म्हणजे तिची आजी म्हणाली,

*'' लीला गं लीला,*
*नको खाऊ गोळा,*
*दुखेल तुझा गळा.*
*सगळं पाणी होईल,*
*नाकात गोळा !''*

आता काय करावे बरे ? लीला विचार करू लागली. तिला एक युक्ती सुचली. ती नदीकडे गेली. नदीला म्हणाली, ''नदी गं नदी !'' पण नदी बोलणार कशी ? मग ती स्वतःच म्हणाली, ''बोल गं लीला.'' मग लीला म्हणाली, ''नदी गं नदी, लीलाला खायचाय बर्फाचा गोळा; पण माई म्हणाली, दुखेल गळा. खाऊ का नको ?'' पण नदी कशी बोलणार ? परत लीलाच म्हणाली, ''मग खा की. पळत जा अन् पटकन खा.'' लीला म्हणाली, ''अगं, पण तुझं कसं ऐकू ? ताई म्हणाली, नको खाऊ. आई म्हणाली, नको खाऊ. माई म्हणाली, नको खाऊ.'' पण नदी कशी बोलणार ? परत लीलाच म्हणाली, 'अगं, ताईपेक्षा मोठी आई. आईपेक्षा मोठी माई. पण माईपेक्षाही मोठी मी – नदीबाई. माझं ऐक.'' ''बरोब्बर !''



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com

लीला पळत बर्फवाल्याकडे गेली. गोळा खाऊन परत आली. तिला बोलणारी नदी खूप आवडली. ताई, आई, माई यांच्यापेक्षा मोठी नदीबाई. तिची परवानगी मिळाली, की आपण हवे ते करू शकतो, असे तिला वाटले.

एक दिवस लीलाला आला कंटाळा. तिला वाटले बुडवावी शाळा. तिने ताईला विचारले. ताई म्हणाली, ''नको बुडवू शाळा.'' आई म्हणाली, ''नको बुडवू.''

माई म्हणाली,

*''लीला गं लीला,*
*आला जरी कंटाळा,*
*बुडवू नकोस शाळा.*
*शिकूनसवरून होशील*
*सुखी माझ्या बाळा.''*



लीला चिडली. कुणीच कसे शाळा बुडवू देत नाही ? 'शाळेला जाते', असे सांगून ती नदीकडे गेली. नदीला म्हणाली, ''नदी गं नदी, लीलाला आलाय कंटाळा, बुडवावी वाटतेय शाळा. काय करू?'' पण नदी कशी बोलणार ? मग लीलाच बोलली, ''आलाय जर कंटाळा, तर बुडव बिनधास्त शाळा.''

ताई, आई, माईपेक्षा मोठ्या नदीबाईने परवानगी दिली म्हटल्यावर लीला शाळेला गेली नाही. दिवसभर नदीकाठी, वावरात खेळत राहिली. संध्याकाळी घरी आली. तिची ताई तिच्याच शाळेत सातवीत शिकत होती. लीलाने शाळा बुडवल्याचे तिला कळले होते. तिने आई अन् माईलापण सांगितले होते. त्या तिघींना लीलाची 'बोलणारी नदी'पण माहीत झाली होती. त्या तिघींनी लीलाची गंमत करायचे ठरवले. तिला शाळा बुडवल्याबद्दल कुणीच काही बोलले नाही.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

काही दिवसांनी आला भोला. भोला म्हणजे लीलाचा मामा. भोलामामा नेहमी खाऊ घेऊन यायचा. त्या दिवशी नेमकी लीला शाळेत निघाली तेव्हा तिचा मामा आला. लीलाला खूप आनंद झाला. ''काय खाऊ आणलास ?'' तिने विचारले.

भोलामामा म्हणाला,

*''लीला गं लीला,*
*माझ्या लाडक्या बाळा,*
*खाऊ म्हणून आणलेत*
*बदामी पेढे सोळा !''*

'सोळा पेढे ! ते पण बदामी !' लीला एकदम खूश झाली; पण शाळेला जायला उशीर होत होता म्हणून ती पळाली. ''संध्याकाळी आल्याबरोबर मी पेढे खाणार !'' लीला ओरडतच गेली. शाळेत दिवसभर तिच्या डोळ्यांसमोर पेढे नाचत होते. ''पेढे कुठे आहेत ?'' लीलाने आल्याबरोबर विचारले. आई म्हणाली, ''शिंकाळ्यावरच्या बुट्टीत डबा ठेवलाय बघ !'' लीलाने स्टूल घेऊन डबा काढला. उघडून पाहते तर डबा सगळा रिकामा. ''आईऽऽ, यात तर एकपण पेढा नाही !'' लीला ओरडली. लीलाचे ओरडणे ऐकून आईला नवल वाटले. आई म्हणाली, ''अगं, असं कसं होईल ?'' तिने ताईला हाक मारली, ''नीला, ए नीला.'' ''काय गं आई?'' नीला परसातून पळत आली. ''अगं, पेढे कुठे गेले ?'' आईने विचारले. ''कुठे गेले म्हणजे मीच खाल्ले. मी खाल्ले आठ अन् नदीला दिले आठ.'' नीला म्हणाली.

''तू बदामी पेढे नदीत टाकलेस ! मूर्ख कुठली.'' आई नीलावर ओरडली. ''अगं हो. तू म्हणालीस,





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

पेढे नको खाऊ. माई म्हणाली, पेढे नको खाऊ. मग मी नदीबाईला विचारलं. नदी म्हणाली,

*‘‘नीला गं नीला,*
*पेढे आहेत सोळा.*
*तू घे आठ, मला दे आठ.’’*

‘‘अगं, पण नदी कशी बोलेल ?’’ माई अन् आई एकदम म्हणाल्या. ‘‘कशी म्हणजे ? लीलाशी बोलते तशी !’’ नीला म्हणाली.

‘‘काय गं लीला, नदी तुझ्याशी बोलते ?’’ माईने विचारले.

‘‘अगं माई, तीच तर लीलाला गोळा खायला सांगते. शाळा बुडवायला सांगते. हो की नाही गं लीला ?’’ नीला मध्येच बोलली.

लीला आता चिडली. तिची खोडी तिच्यावरच उलटली होती. आता काय करावे बरे ? तिने थोडा विचार केला अन् म्हणाली,

*‘‘ताई, आई, माई,*
*समजलं गं बाई,*
*नदीशी बोलायला*
*आता जाणार नाही !’’*

माई हसत कपाटाकडे गेली अन् डबा घेऊन आली.

*‘‘लीला अन् नीला,*
*घ्या एकेक पेढा अन्*
*खेळायला पळा !’’*

‘‘पेढा मिळालाऽऽ’’, असे म्हणत पेढा घेऊन लीला गोठ्याकडे पळाली.

‘‘आता ही काय म्हशीला बोलायला लावणार की काय !’’ माई हसून म्हणाली.

शब्दार्थ : **वावर** – शेत, शिवार. **बिनधास्त** – बेफिकीर, कसलीही काळजी न करता. **शिंकाळे** – छताला टांगलेले दोरीचे जाळे. यात दही, दुधाची भांडी ठेवतात. **बुट्टी** – बांबूची टोपली. **परस** – घरामागची मोकळी जागा.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लीलाला कसली हौस होती ?
(आ) लीलाला काय खायचे होते ?
(इ) नदीबाई कोणाकोणापेक्षा मोठी होती ?
(ई) आईने पेढ्यांचा डबा कोठे ठेवला होता ?
(उ) पेढा घेऊन लीला कोठे गेली ?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**प्र. २. खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या मनाने लिहा.**

(अ) तुम्हांला काय खावेसे वाटते?

(आ) घरातील मोठी माणसे कोणते पदार्थ खाऊ नयेत, असे सांगतात ?

(इ) तुम्हांला कंटाळा आल्यावर काय करावेसे वाटते ?

**प्र. ३. दोन अक्षरी शब्द – गळा, तीन अक्षरी शब्द – घोटाळा, चार अक्षरी शब्द – घळाघळा यांसारखे शेवटी 'ळा' हे अक्षर येणारे प्रत्येकी चार शब्द लिहा.**

**प्र. ४. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) ''नको बुडवू शाळा.''

(आ) ''काय खाऊ आणलास ?''

(इ) ''तू बदामी पेढे नदीत टाकलेस !''

(ई) ''काय गं लीला, नदी तुझ्याशी बोलते ?''

**प्र. ५. खालील शब्दांचे अनेकवचन करा.**

(अ) डबा (आ) बैल (इ) नदी (ई) डोळा (उ) दिवस (ऊ) पेढा

**प्र. ६. लीलाप्रमाणे तुम्हांला नदीशी बोलायचे असेल, तर तुम्ही नदीशी काय बोलाल ?**

**प्र. ७. या पाठात 'वावर' हा शब्द आलेला आहे. वावर या शब्दाचे दोन अर्थ सांगणारी खालील वाक्ये वाचा.**

- रामजीच्या वावरात कापसाचे पीक आहे. (वावर–शेत)
- सरपंचांच्या घरात लोकांचा नेहमी वावर असतो. (वावर–वर्दळ, ये–जा.)

याप्रमाणे दोन अर्थ असलेले पाच शब्द शोधा. प्रत्येक शब्दाचे दोन अर्थ दाखवणारी वाक्ये लिहा.

**उपक्रम :** शिक्षक किंवा पालक यांच्यासोबत तुमच्या गावातल्या नदीवर जा. नदीचे निरीक्षण करा. वहीत नोंदवा.






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आम्ही संवाद करतो











- **वरील चित्रांतील पक्षी व प्राणी आपल्या पिलांशी काय बोलत असतील याची कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिहा.**


**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. तुम्ही घरी तुमच्या आई-बाबांशी काय काय बोलता, त्यांना काय काय सांगता ते विद्यार्थ्यांना विचारावे. विद्यार्थ्यांनी लिहिलेले संवाद त्यांच्याकडून साभिनय म्हणून घ्यावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ३. आम्हांलाही हवाय मोबाइल !



माझं एकदा ऐक ना आई. मी आता मोठी झाले, असं तूच नाही का म्हणालीस? मग मलाही सगळ्यांसारखा एक छान मोबाइल फोन पाहिजे की नाही? कशासाठी म्हणजे काय ? बोलण्यासाठीच ना असतो फोन? वा...! गम्मतच आहे. ताईने मागितला, की लगेच मिळतो फोन. दादा तर कॉलेजलासुद्‌धा नेतो त्याचा मोबाइल. बाबांकडे दोन-दोन मोबाइल असतात अन् आम्ही मागितला तर म्हणे गरज काय त्याची ?

ए... तायडे, उगीचच काहीही बोलू नकोस हं. तुला मोबाइल मिळाला, तेव्हा मी काही बोलले होते का ? हो, हो. आम्हांलाही महत्त्वाची कामं असतात, महत्त्वाचं बोलायचं असतं. दादाचा फोन घेते मी कधीकधी, पण फक्त गेम्स खेळण्यासाठीच गं. बोलण्यासाठी काय करावं मग?

आई, पुढल्या महिन्यात माझा वाढदिवस येतोय. मित्रमैत्रिणींना पार्टीसाठी बोलवायला किती मजा येईल ! 'अरे ! उद्या संध्याकाळी माझी बर्थडे पार्टी घरीच आहे गच्चीवर. तू जरा लवकर येशील ना ? गुड. अगं, खूप धमाल करू ! हो, सगळ्यांना आता फोनवरच सांगतेय. बाय.'

वाव ! किती मस्त वाटेल असे फोन करताना. आई, अगं शाळेत अचानक सुट्टी घ्यावी लागली, तर उगीच बोलणी ऐकावी लागतात सरांची. त्यापेक्षा पपा कसे घरातूनच ऑफिसला फोन करतात, तसा सरांना शाळेत फोन करायचा. 'हॅलो... गुड मॉर्निंग सर, मला आजची सुट्टी मिळेल का ? जरा महत्त्वाचं काम आहे घरी. हो सर, उद्या नक्की येणार शाळेत. थँक्यू सर.'

खूप कामं करता येतात अशी. तू सांग ना बाबांना. ताईच्या वेळी नाही का तूच सांगितलंस बाबांना. ताई तुझी लाडकी आणि मी काय दोडकी आहे का गं ? आता तुझ्याकडे नसला म्हणून काय मलाही नको का मोबाइल? अगं, माझा मोबाइल आला, की तो आपण दोघीमिळून वापरू. नक्की. आजी... तू नको आईला रागावूस. काय म्हणतेस? तुम्हा मुलांना मोबाइलवर किती वेळ बोलावं याचं भानच नसतं. अगं, मोबाइल फोनमुळे कोणालाही संपर्क करता येतो. दादा तर सारखं मित्रांना सांगतो, 'अरे, मी ग्रंथालयात अभ्यास करतोय.' तू म्हणतेस ते खरं, पण मोठी माणसं करतात असं. आम्ही मुलं नाही करणार. देऊन तर बघा आधी मोबाइल आमच्या हातात. पपांना तर सांग. बघू काय होतंय ते !

**- सूर्यकांत सराफ**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून नाट्यछटा वाचून घ्यावी. दिवाकरांच्या नाट्यछटा मिळवून त्या साभिनय सादर करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ४. या भारतात...

- ऐका. म्हणा. वाचा.



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे ।
मतभेद नसू दे ॥ धृ. ॥

नांदोत सुखे गरीब, अमीर एकमतानी ।
मग हिंदु असो ख्रिश्चन वा हो इस्लामी ।
स्वातंत्र्य-सुखा या सकलांमाजि वसू दे ।
दे वरचि असा दे ॥ १ ॥

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना ।
हो सर्व स्थळी मिळुनि समुदाय-प्रार्थना ।
उद्योगि तरुण वीर शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ॥ २ ॥

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।
खळनिंदका-मनीहि सत्य न्याय वसू दे ।
दे वरचि असा दे ॥ ३ ॥

सौंदर्य रमो घराघरांत स्वर्गियापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ति भीति बोहरी ।
तुकड्यास सदासर्वदा सेवेत कसू दे ।
दे वरचि असा दे ॥ ४ ॥

**– राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ही कविता तालासुरात म्हणून घ्यावी.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ५. मला शिकायचंय !

खानदेशातील एक गाव. त्या गावामध्ये सखाराम व त्याचं कुटुंब राहत होतं. सखाराम व त्याची पत्नी सुलभा हे दोघं दिवसभर उन्हातान्हात मजुरी करायचे. त्यांना स्नेहा नावाची एक मुलगी होती. तिचं चौथीपर्यंतचं शिक्षण झालं होतं. ती अत्यंत अभ्यासू व कष्टाळू होती. तिचा छोटा भाऊ पिंटू पहिलीत जाणार होता. गावात चौथीच्या पुढचे वर्ग नव्हते. 'वडील आपल्याला शिक्षणासाठी परगावी पाठवतील का,' असं सारखं स्नेहाला वाटायचं. बबली नावाची तिची मैत्रीण शिक्षणासाठी शेजारच्या गावी जाणार होती. स्नेहालाही तिच्यासारखं आपण पुढे शिकावं असं वाटायचं. तिच्या मनात शिक्षणाचाच विचार सारखा घोळत होता.

एके दिवशी नेहमीसारखं काम संपवून सखाराम व सुलभा घरी आले. मुलांना घरी ठेवून ते दोघं शेतावर गेले होते. पिंटू ओट्यावर खेळत असलेला सुलभाला दिसला, पण स्नेहा कुठे दिसत नव्हती. सुलभानं लगेचच 'स्नेहा, स्नेहा' म्हणून हाका मारल्या. आईची हाक ऐकताच स्नेहाच्या रडण्याचा आवाज वाढला. एका कोपऱ्यात बसून स्नेहा रडत असलेली सुलभाला दिसली. सुलभा तिच्या जवळ गेली. रडून रडून स्नेहाचे डोळे सुजले होते. सुलभा चिंतेत पडली. 'काय झालं' म्हणून तिला विचारू लागली. तेव्हा रडवेल्या आवाजात स्नेहा बोलू लागली.



''वर्गामधल्या बबलीनं पाचवीमा नाव टाकाई गयं... मन्हंबी नाव टाका पाचवीमा. ओ माय, माले पुढे शिकानं शे... माले शिकू द्यानं.'' तेवढ्यात हातपाय धुऊन सखाराम तिथे आला.

''स्नेहा, तुले चवथीलोंग शिकाडं... आते आनखीन पुढे शिकीसन काय करशीन तू ? आपली परिस्थिती आशी गरीबीनी.... परगावले कसा धाडू तुले... एसटीमा ये-जा करनी पडीन... तनंपेक्षा आते शाय बंद... घर बशीसन धाकला भाऊले संभाय. समजनं का तुले ?'' सखाराम थोड्या रागातच म्हणाला.



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com

''दादाले सांगना ओ माय, माले पाचवीमा जावू द्या.... शिकू द्या.'' असं म्हणत स्नेहा पुन्हा रडायला लागली. सुलभाला गहिवरून आलं. तिचे डोळे पाणावले. नवऱ्याला कसं समजावून सांगावं हेच तिला समजेना.

गावात चौथीपर्यंत शाळा होती, म्हणून गावातील बरेच लोक मुलांना चौथीपर्यंत शिकवत होते. गरिबीमुळे मुलीला परगावी शिकवणं सखारामला अवघड वाटत होतं. सखारामच्या भाऊबंदांमध्ये पोरींना कुणीही चौथीच्या पुढे परगावी पाठवून शिकवलं नव्हतं. त्यामुळे तोही त्यांचाच कित्ता गिरवणार होता. त्याचा निर्णय पक्का होता.

स्नेहाच्या वर्गामधली बबली गावच्या सरपंचांची मुलगी होती. आडगावला जाऊन सरपंचांनी पाचव्या इयत्तेत बबलीला प्रवेश घेतला होता. स्नेहाला तिचे बाबा पुढे शिकवणार नाहीत, असं मुख्याध्यापकांना समजलं. सरपंचांना बरोबर घेऊन ते सखारामच्या घरी आले.

सरपंच अचानक आपल्या घरी आलेले पाहून सखारामला अचंबा वाटला. बबली स्नेहाकडे नेहमी येत असे. स्नेहा अत्यंत हुशार मुलगी म्हणून सरपंचांना तिचं मोठं कौतुक. ''कायद्याप्रमाणे मुलीला शिकवावंच लागेल. तुझी कोणतीही अडचण असली तरी आपण ती सोडवू, पण स्नेहाला पुढे शाळेत पाठव.'' सरपंच बोलले.



मान खाली घालून सखाराम उभा होता. मुख्याध्यापक पोटतिडकीनं बोलू लागले.

''सखाभाऊ, तुमची लेक हुशार आहे. तिनं शिष्यवृत्ती परीक्षा दिली आहे. तिला पुढे शिकवा. स्वावलंबी बनू द्या.''

सरपंच समजुतीच्या स्वरात म्हणाले, ''अरे सखा, तुन्ही पोरगी एवढीच मन्ही बबली. तिनाच वर्गामधनी. तिलेबी मी धाडणार शे ना... पाचवी इयत्तामा... अरे, आडगावनी शाय आठून अर्धा तासना अंतरवर शे... मन्हा लेक संगे जाईन ती एसटीमा.''

सखाराम विचारमग्न झाला होता.

''खरं सांग सखा, तुन्हा पिंटूले पाचवीमा धाडशीनच ना ? मंग पोरगीना बाबतमाच असा भेद कसाले? सांग सखाराम.''

सखाराम निरुत्तर झाला. मुख्याध्यापकांनी बोलायला सुरुवात केली.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

''अहो सखाराम, तुम्हांला माहीत आहे का, आपल्या जिल्ह्याची जिल्हाधिकारी कोण आहे ? एक महिलाच आहे. तालुक्याच्या पोलीस स्टेशनलाही इन्स्पेक्टर म्हणून महिलाच आहे. शेजारच्या गल्लीतल्या त्या दामूअण्णांची लेक डॉक्टर झाली गेल्या वर्षी. माहितीय ना तुम्हांला ! अजून किती उदाहरणं द्यायची ! आता कित्येक डॉक्टर, वकील, इंजिनियर या महिला आहेत. त्या साऱ्यांच्या पालकांनी तुमच्यासारखाच विचार केला असता तर ?''

सखारामला काय बोलावं ते सुचेना. आता त्याला पटलं होतं – 'आपुरं शिक्शन नको.. दिनरात कष्ट करसू, रगतनं पानी करसू, पन मन्हा आंडेरले शिकाडसू...' तसं त्यानं बोलून दाखवलं.

स्नेहानं वडिलांकडे पाहिलं व ती त्यांना आनंदानं बिलगली. सरपंच व मुख्याध्यापक त्या दोघांकडे पाहतच राहिले. स्नेहाचा चेहरा आनंदानं फुलला होता.

**– आबा गोविंदा महाजन**

शब्दार्थ : **पाचवीमा** – पाचवीला. **मन्हंबी** – माझंपण. **माले** – मला. **चवथीलोंग** – चौथीपर्यंत. **शिकाडं** – शिकवलं. **आते** – आता. **शिकीसन** – शिकून. **गरीबीनी** – गरिबीची. **परगावले** – परगावला. **धाडू** – पाठवू. **तुले** – तुला. **एसटीमा** – एस. टी. ने. **पडीन** – पडेल. **तनंपेक्षा** – त्यापेक्षा. **शाय** – शाळा. **बशीसन** – बसून. **धाकला** – धाकटा. **भाऊले** – भावाला. **संभाय** – सांभाळ. **अचंबा** – आश्चर्य. **तुन्ही** – तुझी. **मन्ही** – माझी. **तिनाच** – तिच्याच. **तिलेबी** – तिलापण. **शे ना** – आहे ना. **आठून** – इथून. **मन्हा** – माझ्या. **बाबतमाच** – बाबतीतच. **रगतनं** – रक्ताचं. **करसू** – करेन. **आंडेरले** – मुलीला. **शिकाडसू** – शिकवेन.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) स्नेहा का रडत होती ?
(आ) सरपंचांनी बबलीला कोणत्या इयत्तेत प्रवेश घेतला होता ?
(इ) मुख्याध्यापक आणि सरपंच सखारामच्या घरी का गेले ?
(ई) स्नेहाला अतिशय आनंद का झाला ?

**प्र. २. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) स्नेहाची आई चिंतेत का पडली ?
(आ) मुख्याध्यापक सखारामला पोटतिडकीने काय सांगू लागले ?
(इ) सरपंच समजुतीच्या स्वरात सखारामला काय म्हणाले ?
(ई) सखारामने शेवटी कोणता निर्णय घेतला ?

**प्र. ३. खालील शब्दसमूहांचा/वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

(अ) चिंतेत पडणे.
(आ) गहिवरून येणे.
(इ) डोळे पाणावणे.
(ई) अचंबा वाटणे.
(उ) पोटतिडकीने बोलणे.
(ऊ) रक्ताचे पाणी करणे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**प्र. ४. तुम्हांला काय वाटेल, ते लिहा.**

(अ) खूप पुस्तके पाहून.

(आ) बाजारात फिरताना.

(इ) आजारी व्यक्तीला पाहून.

(ई) झोपेत असताना कोणी हाका मारल्या तर.

**प्र. ५. खानदेशातील लोक कसे बोलतात याची काही उदाहरणे खाली दिली आहेत. पाठातील संवादाची हीच वाक्ये तुम्ही तुमच्या परिसरात कशी बोलाल ते त्या-त्या वाक्यासमोर लिहा.**

| | **पाठातील संवाद** |
|---|---|
| (अ) | ओ माय, माले पुढे शिकानं शे ... |
| (आ) | स्नेहा, तुले चवथीलोंग शिकाडं...<br>आते आनखीन पुढे शिकीसन काय करशीन तू ? |
| (इ) | अरे सखा, तुन्ही पोरगी एवढीच मन्ही बबली.<br>तिनाच वर्गामधनी. |
| (ई) | मंग पोरगीना बाबतमाच असा भेद कसाले ? |
| (उ) | आपुरं शिक्शन नको. दिनरात कष्ट करसू,<br>रगतनं पानी करसू, पन मन्ही आंडेरले शिकाडसू. |

**उपक्रम :**

१. तुमच्या परिसरात सण-समारंभाच्या दिवशी गायली जाणारी गाणी संग्रहित करा.

२. पाच-सहा जणांचे गट बनवा. तुमच्या गल्लीत/गावात/शहरात १४ वर्षे वयापर्यंतच्या शाळेत न जाणाऱ्या मुलामुलींचा शोध घ्या. अशी मुले आढळल्यास त्यांच्या पालकांना समजावून सांगा. अशा मुलांची नावे व पत्ते शिक्षक-मुख्याध्यापक यांच्याकडे द्या.

३. माहिती सांगा.

- तुमच्या गावाचे/शहराचे नाव.
- जिल्ह्याचे नाव.
- तुमच्या गावाची/शहराची लोकसंख्या.
- तुमच्या गावाचे/शहराचे सरपंच/नगराध्यक्ष/महापौर.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आम्ही कथा लिहितो – १

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा पूर्ण करा. यातली गंमत म्हणजे प्रत्येकाला स्वतःच्या मनासारखी कथा तयार करता येईल. कथा तयार करा आणि वर्गात सगळ्यांना ऐकवा. तयार केलेल्या कथेला शीर्षक द्या.

**मुद्दे :** घनदाट जंगल – वाघ आणि त्याचं पिल्लू – पिल्लू बोलत नाही – बोलायला शिकवण्यासाठी मांजरीची नेमणूक – म्याँव, म्याँव शिकवण्याचा प्रयत्न – वाघोबा वैतागतो – आता शिकवायला गाढवदादा येतात – ते खिंकाळायला सुरुवात करतात – पुन्हा वाघोबाचा वैताग आणि पिल्लू हैराण – तिसऱ्या वेळी बैलाची नेमणूक – वाघोबाचा वैताग वाढतो – एक दिवस पिल्लू जंगलात फिरते – दबा धरून बसलेला शिकारी – पिल्लावर बंदुकीचा नेम धरतो – पिल्लू डरकाळी – शिकारी धूम ठोकतो – वाघोबा खूश.



**शिक्षकांसाठी :** वरील मुद्दे विद्यार्थ्यांकडून स्वतंत्रपणे वाचून घ्यावे. त्यांआधारे गोष्ट लिहायला सांगावी. वर्गात प्रत्येकाकडून गोष्ट वाचून घ्यावी. विद्यार्थ्यांना वरील चित्रांच्या आधारे आणखी एखादी गोष्ट तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ६. मायेची पाखर



कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल मला अत्यंत आदर आहे. एकदा मी पुण्याला जाताना वाटेत सातारला थांबलो. भाऊरावांना भेटावे म्हणून त्यांच्याकडे गेलो. त्यांची भेट झाली. मला खूप समाधान वाटले.

सर्वजण भाऊरावांना अण्णा म्हणत असत. अण्णांनी मला संस्था दाखवण्यासाठी नेले. संस्था पाहून झाली. अंधार पडला, रात्र झाली. 'आता इथंच मुक्काम करा!' अण्णांनी मला आग्रह केला. अण्णांचा तो आग्रह ! नाही कसे म्हणायचे ? राहिलो झाले तिथे.

मी संस्थेचा परिसर पाहत निघालो. संस्थेच्या आवारात एक मोठे वडाचे झाड होते. आजूबाजूलाही गर्द झाडी होती. थंडीचे दिवस होते. कडाक्याची थंडी पडली होती. मुले पत्र्याच्या खोल्यांतून राहत होती. पत्र्यांनी बनवलेल्या अशाच एका खोलीत अण्णा बसलेले होते. मीही त्यांच्याजवळ जाऊन बसलो. त्यांनी मला जेवणाचा आग्रह केला.

'नुकतंच जेवण झालंय माझं,' असे मी त्यांना सांगितले. अर्थात हे सर्व खोटेच होते. वसतिगृहाच्या मुलांनी केलेले जेवण ते कसे असणार ! म्हणून मी जेवणाची टाळाटाळ केली.

मुलांची जेवणे झाली, प्रार्थना झाली आणि ती सर्व झोपी गेली. माझ्या पोटात मात्र कावळे ओरडत होते. मग मला झोप कशी येणार ? मी तसाच पडून राहिलो.


अण्णांनी हे ओळखले. त्यांनी एका मुलाला आज्ञा केली, ''जा रे, स्वयंपाकघरात काही शिल्लक असेल ते घेऊन ये बघू !'' मुलगा धावतच स्वयंपाकघरात गेला. पिठले, भाकरी, कांदा, तेल एका ताटात घेऊन आला. मी अधाश्यासारखा त्यावर तुटून पडलो. पंचपक्वान्नांपेक्षाही ते मला रुचकर लागले. मग काय, बिछान्यावर पडल्या पडल्याच डोळा लागला. मध्यरात्र उलटून गेली. कशाची तरी चाहूल लागून मला जाग आली. अण्णा उठले होते. त्यांनी कंदील हातात घेतला. प्रत्येक मुलाला झोप लागली की नाही, त्याच्या अंगावर पांघरूण आहे की नाही ते अण्णा पाहू लागले. त्यांनी पाहिले, की एक मुलगा थंडीने कुडकुडत आहे. अण्णा त्याच्याजवळ गेले. त्यांनी त्याला आपल्या दोन्ही हातांनी अलगत उचलले. स्वत:च्या बिछान्यावर आणून झोपवले. स्वत:ची कांबळी त्याच्या अंगावर घातली. त्याला अगदी आपल्या पोटाशी धरले. त्या उबेत तो मुलगा गाढ झोपी गेला.

त्या मुलांपैकी कितीतरी जणांना आई नव्हती. कितीतरी जणांना वडील नव्हते; पण अण्णांनी त्यांच्यावर पित्याच्या प्रेमाचा आणि मातेच्या मायेचा वर्षाव केला होता. अशी होती अण्णांच्या मायेची पाखर. हे सर्व मी उघड्या डोळ्यांनी पाहिले.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



सकाळी मी उठलो. अण्णांना कडकडून भेटलो. नकळतच माझ्या मुखातून शब्द बाहेर पडले, ''अण्णा, आपण खरेखुरे या मुलांचे आईबाप आहात. या मुलांचेच नव्हे, तर या महाराष्ट्रातील गोरगरिबांच्या मुलांचे आपण पालक आहात. आपणांस उदंड आयुष्य मिळो !''

अण्णा आयुष्यभर गोरगरिबांच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी झटत राहिले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर शाळा सुरू केल्या. उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये सुरू केली. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उत्तुंग कार्यामुळे त्यांना सर्वजण 'कर्मवीर' म्हणून ओळखतात.

**– पां. चिं. पाटील**

(**मायेची पाखर –** पक्षी मायेपोटी आपल्या पिलांना पंखाखाली घेतात, तसेच आपल्या संस्थेत शिक्षणासाठी आलेल्या मुलांवर भाऊराव पाटील यांनी जिवापाड प्रेम केले.)

**शब्दार्थ : पोटात कावळे ओरडणे –** खूप भूक लागणे. **अधाशी –** हावरा, खादाड. **रुचकर–** चवदार. **बिछाना –** अंथरूण. **थंडीने कुडकुडणे –** खूप थंडी वाजणे. **पोटाशी धरणे –** मायेने जवळ घेणे. **ऊब –** उष्णता. **मायेचा वर्षाव करणे –** खूप प्रेम करणे. **उदंड –** खूप, पुष्कळ.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पाहुण्यांनी अगोदर जेवायचे का नाकारले ?
(आ) वसतिगृहातील मुलांवर अण्णांची माया कोणाप्रमाणे होती ?
(इ) अण्णा आयुष्यभर कोणाच्या शिक्षणासाठी झटत राहिले ?
(ई) कर्मवीर भाऊरावांनी कोणत्या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शाळा सुरू केल्या ?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) संस्थेच्या आवारात एक मोठे .................. झाड होते.

(आ) स्वत:ची .................. त्याच्या अंगावर घातली.

(इ) त्या मुलांपैकी कितीतरी जणांना .................. नव्हती.

(ई) ''अण्णा, आपण खरेखुरे या मुलांचे ........... आहात.''

**प्र. ३. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) ''आता इथंच मुक्काम करा !''

(आ) ''जा रे, स्वयंपाकघरात काही शिल्लक असेल ते घेऊन ये बघू !''

(इ) ''आपणांस उदंड आयुष्य मिळो !''

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लेखक उपाशी आहेत, हे समजल्यावर अण्णांनी काय केले ?

(आ) मध्यरात्रीनंतर कोणता प्रसंग घडला ?

(इ) सकाळी उठल्यावर लेखकांच्या तोंडून कोणते उद्‌गार निघाले ?

**प्र. ५. वाक्प्रचार व त्यांचा अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) टाळाटाळ करणे. | (अ) झोप लागणे. |
| (२) पोटात कावळे ओरडणे. | (आ) सतत प्रयत्न करणे. |
| (३) डोळा लागणे. | (इ) एखादी गोष्ट करायचे टाळणे. |
| (४) झटत राहणे. | (ई) खूप भूक लागणे. |

**प्र. ६. लेखकाच्या पोटात कावळे ओरडत होते, म्हणजे लेखकाला खूप भूक लागली होती. आता खालील वाक्यांतील रंगीत शब्दांचा अर्थ शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

(अ) भरपूर जेवण झाल्यावर नाना **अजगरासारखे पडून** होते.

(आ) दुपारच्या वेळी हळूच खाऊ घेताना बंड्या अजिबात आवाज होऊ देत नाही; म्हणून त्याला सगळे **मांजरीच्या पायाचा** म्हणतात.

**प्र. ७. लिहा.**

लेखकाला कर्मवीर भाऊराव पाटलांबद्दल अत्यंत आदर आहे. तसा तुम्हांला आदर वाटणाऱ्या व्यक्तींबद्दल पाच ते सात ओळींत लिहा.

**प्र. ८. सुरुवातीला एक वाक्य दिले आहे. तुमच्या मनाने पुढील वाक्ये लिहा.**

(अ) सकाळची वेळ होती.

.......................................

.......................................

.......................................

.......................................

(आ) बागेत गेल्यावर मला एक अळी दिसली.

.......................................

.......................................

.......................................

.......................................



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**उपक्रम :**

१. शैक्षणिक संस्था स्थापन केलेल्या थोर समाजसुधारकांचे फोटो मिळवा. चिकटवहीत चिकटवून त्यांची नावे लिहा.
२. तुमच्या गावातल्या वसतिगृहात जाऊन तेथील मुलांशी/मुलींशी गप्पा मारा. तुम्हांला तिथे आढळलेल्या गोष्टींची नोंद करा.
३. आपल्या परिसरातील शैक्षणिक संस्थांची यादी करा.

- **वाचा. समजून घ्या.**

अशा पुस्तकांमधून छान छान गोष्टी वाचता येतात.

या पुस्तकावर पेन आहे.

या पुस्तकावरून माझी आणि ताईची भांडणं होतात.

या पुस्तकाच्या त्रेपन्नाव्या पानावर घुबडाचे चित्र आहे.



पुस्तकांना नीट हाताळावे.

या पुस्तकावर तीस रुपये सूट मिळाली होती.

या पुस्तकातून मी मजेशीर विनोद वाचले.

मला हे पुस्तक आवडतं.

या पुस्तकातली प्रत्येक गोष्ट विनोदी आहे.

- **'पुस्तक' हा एकच शब्द वरील वाक्यांमध्ये कसा विविध प्रकारे आला आहे ते वाचा. नीट समजावून घ्या. आता 'डुक्कर' हा शब्द योग्य प्रकारे वापरून खालील वाक्ये पूर्ण करा.**

(अ) काही लोक शेतीसोबत .................. पाळण्याचा व्यवसाय करतात.
(आ) .................. आपल्याला चामडे मिळते.
(इ) .................. वराह असेही म्हणतात.
(ई) डुक्कर पाळणारे लोक .................. खूप माया करतात.
(उ) खवळलेल्या .................. मारलेल्या मुसंडीला लोक घाबरतात.

**शिक्षकांसाठी :** वरील चौकटीत 'पुस्तक' या शब्दाची काही रूपे दिली आहेत. विद्यार्थ्यांना ती समजावून सांगावी. असेच काही शब्द घेऊन त्या शब्दांची विविध रूपे विद्यार्थ्यांना समजावून सांगावी.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ७. धूळपेरणी

• **ऐका. म्हणा. वाचा.**



असो बरकत
धूळपेरणीला,
लागला मातीचा
जीव झुरणीला.

हिरव्या पिसांचा
ध्यास धरणीला,
टिपूर मोत्यांची
आस मोरणीला.

येऊ नये कधी
दिवस जाचक,
कासावीस डोळे
बनले चातक.

कोरडे नक्षत्र
पूर पापणीला,
आलेलं आभूट
दूर दाटणीला.

मिळता डोळ्यांना
मेघुट इशारे,
मातीच्या कणांना
फुटले धुमारे.

**– अशोक कौतिक कोळी**

**शब्दार्थ :** **बरकत** – भरभराट. **धूळपेरणी** – पाऊस पडण्यापूर्वी केलेली पेरणी. **आस** – ओढ, इच्छा, अपेक्षा. **जाचक** – त्रास देणारे. **कासावीस** – व्याकूळ. **चातक** – ढगातील पाणी पिऊन राहतो अशी समजूत असलेला एक पक्षी. **आभूट** – ढगाळ आकाश. **मेघुट** – ढग दाटून येणे. **धुमारे** – झाडाला फुटलेली नवी पालवी.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कोणाचा जीव झुरणीला लागला ?

(आ) धरणीला कशाचा ध्यास आहे ?

(इ) कोणते दिवस येऊ नयेत, असे कवीला वाटते ?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कोरडे नक्षत्र गेल्यावर शेतकऱ्याच्या मनात कोणकोणते विचार येत असतील ?

(आ) शेतकऱ्याच्या शेतात भरपूर पीक आले, तर त्याच्या मनात कोणते विचार येतील ?

(इ) पाऊस पडला नाही तर काय होईल, असे तुम्हांला वाटते ?

**प्र. ३. ओळी पूर्ण करा.**

(अ) ........... बरकत
धूळ ...........,

(आ) ........... मोत्यांची
आस ........... .

(इ) कासावीस ...........
बनले ...........

(ई) मिळता ...........
........... इशारे,

**प्र. ४. खालील ओळींचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) हिरव्या पिसांचा
ध्यास धरणीला.

(आ) मातीच्या कणाला
फुटले धुमारे.

**प्र. ५. पावसाळा येऊनही पाऊस पडत नसला, की शेतकऱ्यांना दिवस जाचक म्हणजे त्रासाचे वाटू लागतात. तुमच्या परिसरातील खालील व्यक्तींना कोणते दिवस जाचक वाटत असतील, याविषयी त्यांच्याशी चर्चा करा.**

(अ) बांधकामावर काम करणारे मजूर.

(आ) आई-वडील.

(इ) ऊसतोडणी कामगार.

(ई) शिक्षक.

(उ) शाळेबाहेर खाऊ विकणारे.

**प्र. ६. ही कविता धूळपेरणीची आहे. या कवितेत शेतकरी पावसाची वाट पाहत आहे. पाऊस आला नाही, तर त्याला शेती करता येणार नाही. या उलट काही लोकांना खूप पाऊस आला, तर काम/व्यवसाय करता येणार नाही. अशा लोकांची माहिती घ्या. उदा.,** रस्त्याच्या कडेला बसून भाजी विकणारे.

**उपक्रम :**

१. शेतकरी, शेतमजूर यांपैकी कोणाचीही मुलाखत घ्या.

२. पावसाच्या नक्षत्रांची नावे माहीत करून घ्या.

३. अन्नधान्य योग्य पद्धतीने वापरले जावे, याची जाणीव सर्वांना करून देण्यासाठी घोषवाक्ये तयार करा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## चला, वाचूया.

पाऊस पडेल, या आशेने शेतकरी पेरणी करतात. त्याला धूळपेरणी म्हणतात. पाऊस लवकर पडेल, अशी त्यांना आशा असते. पाऊस उशिरा पडला किंवा फारच कमी पडला, तर पेरलेले बी वाया जाते. दुबार पेरणी करावी लागते. हा खर्च शेतकऱ्यांना परवडत नाही आणि दुबार पेरणीचे पीकही पहिल्या पेरणीसारखे चांगले येत नाही. कधी पाऊस खूप पडतो तर कधी पडतच नाही. उगवलेले पीक वाया जाते. शेतात पीक पिकले तरी पिकांवर अनेकवेळा रोग पडतो. कडाक्याची थंडी पडून देखील पीक वाया जाते आणि शेतकरी अडचणीत सापडतात.

इयत्ता दुसरीच्या पाठ्यपुस्तकात 'भाकरीची गोष्ट' हा पाठ दिलेला आहे. तो तुम्ही वाचा. धान्य पिकवण्यामागे शेतकऱ्यांना किती कष्ट करावे लागतात ते त्या पाठात दिलेले आहे. ऊन, पाऊस, कडक थंडी, दिवस, रात्र शेतकरी शेतात कष्ट करत असतात.

'आपण धान्य सहज विकत घेऊ शकतो', असे आपल्याला वाटते; परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा पाण्याअभावी धान्यच पिकले नाही, तर कितीही पैसा असूनही त्याचा उपयोग नाही. आपल्याला जगण्यासाठी अन्नाची गरज असते. त्यासाठी गरजेएवढेच अन्न शिजवणे, जेवताना हवे तेवढेच अन्न ताटात घेणे, ताटात अन्न न टाकणे या प्रकारे आपण अन्नधान्याची जपणूक केली पाहिजे.



## वाचा.

**रुग्ण** : माझा एक दात खराब झाला आहे.

**डॉक्टर** : त्या जागी आपण दुसरा दात बसवूया.

**रुग्ण** : दात मात्र माझ्या दातासारखाच हवा.

**डॉक्टर** : ते शक्य नाही.

**रुग्ण** : का?

**डॉक्टर** : एवढे घाणेरडे दात माझ्याकडे नाहीत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ८. गुणग्राहक राजा



तिशी ओलांडलेले सयाजीराव गायकवाड फेरफटक्यास निघाले. बरोबर मानकरी नारायणराव घाटगे होते. एवढ्यात मुलांचा हसण्या-खिदळण्याचा आवाज ऐकू आला. महाराजांनी घोडा थांबवला. आवाजाच्या दिशेनं पाहिलं. तिथे एक वडाचं झाड होतं. एक पोरगा माकडासारखा उड्या मारत खोडावर चढला. दुसरा पोरगा त्याचा पाठलाग करत होता. पहिल्यानं पारंबी पकडली. माकडासारखा झोका घेतला. घोड्यावर बसल्यासारखा फांदीवर बसला. दोघा पोरांचा सुरपारंबीचा खेळ सुरू झाला. सयाजीराव महाराज देहभान विसरून खेळ बघू लागले. मनानं त्यांच्या बालपणातील 'मौजे कवळाणे' गावी आले. तेथील मारुती मंदिराजवळील वडाच्या झाडावर चढले. पोरांसोबत सुरपारंबी खेळ खेळू लागले.

थोड्या वेळानं महाराज भानावर आले. स्वतःशी हसले. निघताना मानकऱ्यांस म्हणाले, "पोरं चपळ आहेत. कोणाची पोरं आहेत ही ? विद्याधिकाऱ्यांना सांगून त्यांना राजवाड्यात बोलवा."

सयाजीराव गायकवाड राजवाड्यात परतले; पण वडाच्या झाडावर माकडासारखी चढणारी आणि उतरणारी पोरं त्यांना नजरेसमोर दिसत होती. घडलेला प्रसंग त्यांनी महाराणीसाहेबांना सांगितला. त्यांनीही तो खेळ पाहण्याची इच्छा व्यक्त केली. सयाजीरावांनी विद्याधिकारी श्री. काटावालांना बोलावलं. नजरपागेतली ती पोरं शोधून आणायचा हुकूम केला. नारायणराव घाटगे यांनी त्या पोरांची नावं व राहण्याचं ठिकाण सांगितलं.

विद्याधिकाऱ्यांचा शिपाई त्या भागात पोहोचला. त्यानं पोरांचा शोध घेतला. गजानन आणि काळूला साहेबांकडे घेऊन आला. "झाडावर चढण्याचा तुमचा खेळ बघून महाराज खूश झाले. हा खेळ महाराणीसाहेबांनाही पाहायचाय. उद्या तिसऱ्या प्रहरी तुम्ही दोघे राजवाड्यात या !" विद्याधिकारी म्हणाले.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

गजानन हा यशवंतराव माणिकचा, तर काळू रहिम चाबूकस्वाराचा मुलगा होता. महाराजांनी पोरांना राजवाड्यात बोलावलं. गल्लीत वार्ता पसरली. पोरांची उत्सुकता वाढली. तरीही घरच्यांना काळजी वाटू लागली, कारण महाराज शिस्तीचे होते.

दुसरा दिवस उजाडला. विद्याधिकाऱ्यांनी पोरांना राजवाड्यात आणले. दोघांचे सदरे मळलेले होते. चेहऱ्यावर मात्र तरतरी होती.

राजवाड्याच्या समोर मोठं झाड होतं. महाराज आणि राणीसाहेब पोरांना घेऊन तिथे आले. बरोबर तीन राजपुत्रही होते. बसण्यासाठी बाजूला सोफे ठेवले होते.


''काय नाव बाळांनो तुमचं ?'' महाराजांनी विचारताच गजानन म्हणाला, ''माझं नाव गजानन माणिक आणि हा काळू चाबूकस्वार.''

''छान ! आम्ही परवा तुमचा सुरपारंबीचा खेळ पाहिला. आज राणीसाहेबांना तो दाखवा.''

गजाननं काळूला खूण केली. मानकऱ्यांनी सूर तयार ठेवला होता. दीड हात लांब व करंगळीच्या जाडीची ती काठी होती. काळूनं सूर हाती घेतला. एक पाय थोडा उचलून पायांखालून सूर दूर फेकला. गजानन तो सूर आणायला धावला. तोपर्यंत काळू सरसर झाडावर चढला.

काळू आणि गजाननची झाडावर चढण्या-उतरण्याची कसरत सुरू झाली. शेवटी गजाननं काळूला पकडलं. आता गजाननं सूर फेकला आणि तो सरकन झाडावर चढला. काळू सूर आणून त्याच्या मागे वर चढला. गजानन फांदीच्या टोकावर जाऊन लटकला. काळू जवळ येताच त्यानं जमिनीवर उडी मारली. पुन्हा तो खोडावर चढला.

गजाननला बाद करणं काळूला जमेना. दोन्ही पोरं धावपळीनं घामाघूम झाली. महाराजांनी खेळ थांबवला. दोघांना जवळ बोलावलं. खुशीत त्यांची पाठ थोपटत ते म्हणाले, ''छान खेळलात. खेळात हारजीत महत्त्वाची नाही. खेळणं महत्त्वाचं आहे. आम्ही तुम्हांला बक्षीस देणार आहोत.''



महाराजांनी घाटग्यांना खूण केली. एका तबकात जरीच्या दोन टोप्या होत्या. त्यांनी गजाननला जवळ बोलावले. ''तू हरला नाहीस म्हणून ही भरजरी टोपी बक्षीस.'' असं म्हणून त्यांनी त्याच्या डोक्यावर टोपी ठेवली. काळूकडे वळत राणीसाहेब म्हणाल्या, ''तू पाठलाग छान केलास म्हणून मी तुला ही जरीची टोपी बक्षीस देत आहे.''

''तुमचा खेळ पाहताना आम्हांला आनंद झाला. एवढंच नाही, तर आम्ही खेळत आहोत, असा अनुभव



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

घेत गेलो.'' महाराज म्हणाले. त्यांनी पोरांना बसवलं. मिठाई खाऊ घातली.

पोरं घोडागाडीतून घरी परतली. त्यांच्या खेळाची आणि टोपीची गोष्ट मोहल्लाभर पसरली.

गजाननच्या शाळेत वार्षिक बक्षीस समारंभ होता. महाराजच बक्षीस समारंभासाठी आले होते. एक पोरगा पुन्हा पुन्हा वेगवेगळी बक्षिसं घेण्यासाठी येऊ लागला. अभ्यासात, चित्रकलेत, एवढंच काय हस्ताक्षर स्पर्धेतही तोच होता. अठरा बक्षिसं त्या पोरानं घेतली. महाराजांनी या गजानन माणिकला ओळखलं. त्याला बघून त्यांना आनंद झाला. ते म्हणाले, ''बघू तुझं हस्ताक्षर !''

गजाननं कागद-शाई मिळवली. कामटीचा बोरू केला. कागदावर लिहिलं -'श्रीमंत सयाजीराव महाराज की जय !' महाराजांनी त्याला जरीची टोपी बक्षीस दिली. विद्याधिकाऱ्यांकडे वळून ते म्हणाले, ''पोरगा गुणी आहे. त्याकडे लक्ष द्या. उद्याचं हे बडोद्याचं रत्न आहे.''

हाच मुलगा पुढे बडोद्याचं राजरत्न गजानन माणिकराव झाला.

**- बाबा भांड**

**शब्दार्थ : देहभान विसरणे -** स्वतःची जाणीव विसरणे. **सूर -** सुरपारंबी या खेळातील काठी. **मोहल्ला -** गल्ली/शहराचा काही भाग. **बोरू -** बांबूपासून तयार केलेली लेखणी.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुले कोणता खेळ खेळत होती ?

(आ) महाराजांनी गजाननला कोणते बक्षीस दिले ?

(इ) गजाननने कागदावर बोरूने काय लिहिले ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) थोड्या वेळानं महाराज ............... आले.

(आ) पोरं ............... घरी परतली.

(इ) ''बघू तुझं ............... !''

**प्र. ३. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) ''पोरं चपळ आहेत. विद्याधिकाऱ्यास सांगून त्यांना राजवाड्यात बोलवा.''

(आ) ''झाडावर चढण्याचा तुमचा खेळ बघून महाराज खूश झाले.''

(इ) ''काय नाव बाळांनो तुमचं ?''

(ई) ''पोरगा गुणी आहे. त्याकडे लक्ष द्या. उद्याचं हे बडोद्याचं रत्न आहे.''

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुलांनी राणीसाहेबांना सुरपारंबीचा खेळ कसा दाखवला ?

(आ) गजाननने कशाकशात बक्षिसे मिळवली ?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**प्र. ५. खालील वाक्यांमधील 'सूर' या शब्दाचे वेगवेगळे अर्थ लिहा.**

(अ) काळूने सूर दूर फेकला.
(आ) आज गाण्यामध्ये खाँसाहेबांचा सूर भन्नाट लागला होता.
(इ) 'एक, दोन, तीऽऽऽन' म्हणत मुलांनी पाण्यात सूर मारला.

**प्र. ६. खालील वाक्यांमधील रंगीत शब्दांचे योग्य अर्थ लिहा.**

(अ) कुणासमोरही **हार** न मानणाऱ्या पहिलवानाचा **हार** घालून सत्कार करण्यात आला.
(आ) सरपंच झाल्यापासून सरोजाला साऱ्या गावाकडून **मान** मिळू लागला. तिचा नवरादेखील आता ताठ **मान** करून फिरतो.
(इ) हातात **तीर**-कमान घेऊन झिंगरूने नदीचा **तीर** गाठला.
(ई) खळखळ वाहणारं **पाटाचं** पाणी पाहून देवजी परतला. घरी आला की लगेच **पाटावर** बसला.

**असे आणखी शब्द शोधून वाक्ये बनवा.**

**उपक्रम :**

१. घरच्या व्यक्तींशी बोलून त्यांच्या लहानपणी ते कोणते खेळ खेळत होते व ते खेळ कसे खेळत होते यांविषयी माहिती जमवा.
२. वेगवेगळ्या खेळांविषयीची माहिती व चित्रे जमवून संग्रह करा.
३. बाजारात फिरून वेगवेगळ्या पद्धतीच्या टोप्यांची माहिती मिळवा. टोप्यांची चित्रे मिळवा. कागदाची/कापडाची टोपी बनवा. ती कशी तयार केली ते सांगा. वर्गात प्रदर्शन भरवा.



## चला, वाचूया.

'शिक्षण हाच सर्व सुधारणांचा पाया आहे', हा विचार सयाजीराव महाराजांनी स्वीकारला. समाजाच्या सर्व थरांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, यासाठी त्यांनी बडोदा संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याचा कायदा केला. त्यांनी अनेक गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन, त्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत करून परदेशी पाठवले. गोरगरिबांची व दलितांची पिळवणुकीतून सुटका केली. सर्व जाती-धर्मांतील मुलांना शाळांमध्ये प्रवेश देण्यास सांगितले. त्यांनी सार्वजनिक ग्रंथालयाचाही कायदा केला व वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन दिले.

शेतीची प्रगती करण्यासाठी धरणे बांधली. शेतकऱ्यांची सावकारांकडून होणारी छळवणूक थांबवली. लोकांच्या हाताला काम मिळाले पाहिजे, यासाठी सयाजीरावांनी कापडाची गिरणी सुरू केली. अनेक उद्योगधंद्यांना प्रोत्साहन दिले. त्यांना देशाबद्दल प्रचंड प्रेम होते.

महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांना त्यांनी मदत केली. सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी सत्तेचा वापर केला. त्यामुळे आपण समाजसुधारक म्हणून त्यांचा गौरव करतो. सयाजीराव एक आदर्श राजे होते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आम्ही आमचे अनुभव लिहितो

- **वाचा. समजून घ्या.**

मुलांनो, तुम्ही अनेक चांगल्या गोष्टी करता. घडलेल्या घटना, प्रसंग तुम्ही मित्रांना सांगता, घरी सांगता; पण तुम्ही लिहून ठेवता का? नाही ना ? काही मुले लिहून ठेवतात. तुम्हीही लिहिण्याचा प्रयत्न करा.

तुमच्याच वयाच्या 'सुमन सोनवणे' या मुलीने लिहिलेला एक अनुभव खाली दिला आहे. तो वाचा. तुम्हांला आलेले अनुभव तुमच्या वहीत लिहा.

आई आणि बाबा बाजारात गेले होते. मी आणि शेजारचा अन्वर गृहपाठ-वही पूर्ण करत बसलो होतो. अंगणातल्या झाडाच्या सावलीत बसून खेळायला, अभ्यास करायला आम्हां दोघांना खूप आवडायचे. आम्ही दोघेही लिहिण्यात दंग होतो. इतक्यात जोराने ओरडण्याचा आवाज आला. आम्ही दचकलो व आवाजाच्या दिशेने धावलो. बघतो तर काय ! मांजरीचे छोटेसे गोजिरवाणे पिलू ! त्याच्या पायाला जखम झाली होती. त्या पिलाच्या पायावरून कुणाची तरी सायकल गेली असावी, असे आम्हांला वाटले. ते खूप घाबरले होते. आम्हीही घाबरून थोडे लांबच जाऊन उभे राहिलो. ते खूप ओरडू लागले. पुन्हा त्याच्याजवळ जाऊन उभे राहिलो. ते इकडे तिकडे पाहत विचित्र आवाज काढत होते. पिलाच्या पायाजवळ थोडेसे रक्त आलेले मला दिसले. लगेच मी घरातून हळद आणली, पाणी आणले व त्याच्या जखमेवर हळद लावली. त्याला पाणी पाजले.

तेवढ्यात आई-बाबा आले. आम्ही त्यांना सर्व काही सांगितले. मांजरीचे पिलू घराच्या पाठीमागच्या दिशेकडे पाहत होते. ते बाबांच्या लक्षात आले. बाबांनी घराच्या मागे जाऊन शोधले. आमच्या घरामागच्या पडक्या भिंतीजवळ एक मांजर व तिची ३-४ पिले आम्हांला दिसली. ती मांजर या जखमी पिलाची आई असावी, असे आम्हांला वाटले. बाबांनी पिलाला अलगत उचलले आणि त्याच्या आईजवळ सोडले. आईला पाहताच ते पिलू आईला बिलगले.

**- सुमन सोनवणे, पोलादपूर.**



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ९. ईदगाह

'रमजान' महिन्याच्या तीस दिवसांनंतर आज ईदचा दिवस आला आहे. किती रम्य, किती सुंदर सकाळ आहे ही ! झाडं हिरवीगार दिसत आहेत. शेतात समृद्धी डोलत आहे. आकाश लालेलाल झालंय. आज सूर्य तर पहा किती सुरेख दिसतोय ! किती शांत, किती सुखद ! जणू तो साऱ्या जगाला ईदच्या शुभेच्छा देत आहे. गावात नुसती गडबड चालली आहे. ईदगाहला जाण्याची तयारी सुरू आहे.

मुलंतर खूप आनंदात आहेत. कुणी एक दिवसाचा रोजा पाळलाय तोही फक्त दुपारपर्यंत; पण कुणीतर तोही पाळलेला नाही; पण ईदगाहला जाण्याचा त्यांचा आनंद उतू जातोय. रोज ईदच्या नावाचा जप चालला होता, ती ईद आज उगवली आहे. मुलांना सगळ्यांत जास्त घाई झालीय. लोक ईदगाहला का येत नाहीयेत, असा प्रश्न त्यांना पडलाय.

सगळ्यांत जास्त आनंदात आहे हमीद. ४-५ वर्षांचा हा गरीब चेहऱ्याचा, हडकुळा मुलगा. याचे अब्बा मागच्यावर्षीच कॉलऱ्याला बळी गेले आणि अम्मी पांढरी पडत पडत एक दिवस मरून गेली. आता हमीद आपल्या म्हाताऱ्या अमीनाआजीच्या कुशीत निजतो. तिच्याजवळ तो सुखात आहे. 'अब्बाजान पैसे कमवायला गेले आहेत. खूप पिशव्या भरून पैसे घेऊन ते परत येतील. अम्मीजान अल्लाच्या घरून आपल्यासाठी खूप छान छान गोष्टी आणायला गेली आहे,' असा त्याचा विश्वास आहे, म्हणूनच तो आनंदात आहे. हमीदजवळ जोडे नाहीत, डोक्यावर जुनीपुराणी टोपी आहे, तिचा वरचा भाग काळा पडला आहे, तरी तो खुशीत आहे.

अमीनाच्या हृदयात कसंसंच होत आहे. गावातली मुलं आपापल्या वडिलांबरोबर ईदगाहला चालली होती. हमीदला अमीनाशिवाय कोण आहे ? 'त्याला एकटं कसं पाठवायचं ? त्या गर्दीत पोरगं कुठं हरवलं तर ? नाही, अमीना त्याला असं एकटं पाठवू शकणार नाही. एवढासा जीव एवढं अंतर चालेल तरी कसा ? पायाला फोड नाही का येणार ? जोडेही नाहीत त्याच्याजवळ!' अमीनाबीकडे फक्त दोन आणे आहेत. तीन पैसे हमीदच्या खिशात व उरलेले तिच्या बटव्यात. एवढंसं धन व हा ईदचा सण ! हमीद आजीला सांगतो, "तू घाबरू नकोस. मी सगळ्यांच्या आधी परत येईन." अमीनानं दिलेले तीन पैसे घेऊन हमीद सवंगड्यांबरोबर निघतो.

गावाहून लोक निघाले. इतर मुलांसोबत हमीदपण चालला होता. कधी ते सगळे धावत धावत पुढे जायचे. कधी एखाद्या झाडाखाली उभे राहून बाकीच्यांची वाट पाहायचे.

अचानक समोर ईदगाह दिसला. चिंचेची दाट सावली त्यावर पडलेली आहे. खाली पक्की फरशी लावलेली आहे. त्यावर जाजम घातलेलं आहे. रोजे करणाऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या आहेत. जाजम नसलेल्या भागापर्यंत रांगा गेल्या आहेत. नंतर येणारे मागे रांगेत उभे आहेत. पुढे जागा मुळीच नाही. इथे सगळे सारखेच आहेत, कुणाचा पैसा वा प्रतिष्ठा पाहिली जात नाही. किती छान व्यवस्था आहे ! सगळे एकदम वाकत आहेत, गुडघे टेकत आहेत. कितीतरी वेळा ही हालचाल होतेय. जणू विजेचे लाखो दिवे एकदम लागावेत, विझावेत असं दृश्य दिसत आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


नमाज संपली. लोक परस्परांना मिठी मारून भेटत आहेत. आता सारे मिठाईच्या व खेळण्यांच्या दुकानांकडे धावतील. हा पाहा झोपाळा. एक पैसा देऊन यावर बसलात, तर घटकेत आकाशात फिरतोय असं वाटेल, तर घटकेत जमिनीवर पडतोय असं वाटेल. हे चक्र आहे. लाकडाचे हत्ती, घोडे, उंट या चक्राला लागलेले आहेत. एक पैसा दिला तर पंचवीस चकरांची मजा घेता येईल. महमूद, मोहसिन, नूर आणि सम्मी त्या चक्रातील घोड्यांवर, उंटावर बसत आहेत. हमीद दूर उभा आहे. त्याच्याजवळ तर तीनच पैसे आहेत. आता खेळण्यांची खरेदी. दुकानांमध्ये तऱ्हेतऱ्हेच्या खेळण्यांचे ढीग पडले आहेत. खेळणी तरी किती प्रकारची – राजा, शिपाई, गुन्हेगार, वकील, पाणक्या, साधू. वा ! किती सुंदर खेळणी आहेत ही ! महमूदनं शिपाई घेतलाय – खाकी पोशाख, लाल पगडी, खांद्यावर बंदूक. वाटतंय, जणू आत्ताच कवायत करून येतोय. मोहसिनला पाणक्या आवडलाय – कमरेला पखाल लावलेला, कमरेतून वाकलेला, सगळ्यांना पाणी वाढणारा. सगळी खेळणी दोन-दोन पैशांना मिळतायत, पण हमीदकडे तीनच पैसे आहेत. तो इतकी महागडी खेळणी कशी घेणार ?

खेळण्यांनंतर नंबर आला मिठाईचा. कुणी रेवड्या घेतल्या तर कुणी गुलाबजामुन, कुणी जिलेबी खातंय तर कुणी करंजी. हमीद मात्र त्याच्या आजीचा विचार करतोय. 'मी तर चिमटा खरेदी करणार. चिमटा पाहून आजी खूश होईल. मला भरभरून आशीर्वाद देईल.'

हमीद एका लोखंडी वस्तूंच्या दुकानापुढे थांबला. तिथे काही चिमटे ठेवलेले होते. फुलके तव्यावरून उतरवायला, विस्तवावर फुलके भाजायला उपयोगी आहे हा चिमटा. पुन्हा कोणी विस्तवातले निखारे मागायला आलं, तर त्याच चिमट्यानं पटापट निखारे उचलून द्यायचे ! बिचाऱ्या आजीला बाजारात जायला तरी कुठे वेळ असतो ! रोज हात भाजतात तिचे ! हमीदची दोस्तमंडळी पुढे गेली आहेत.

हमीदनं दुकानदाराला विचारलं, ''चिमटा कितीला दिला ?''

दुकानदारानं पाहिलं, की या पोराबरोबर कुणी मोठं नाहीये, तेव्हा तो म्हणाला, ''हे तुझ्या कामाचं नाही.''





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

"विक्रीसाठी नाहीय का ?"

"विक्रीसाठी का नाही ? इथवर बोजा आणला असता का ?"

"मग सांगत का नाही किंमत काय पडेल ती?"

"सहा पैसे लागतील."

हमीद थोडा थबकला. "बरोबर भाव सांगा." तो म्हणाला.

"योग्य भाव ? पाच पैसे लागतील. घ्यायचं असेल तर घे नाहीतर चालू लाग."

"तीन पैशांना देणार का ?" हमीद थोडा धाडसानं म्हणाला आणि पुढे निघाला. त्याला वाटलं दुकानदार त्याला धुडकावून लावेल; पण दुकानदारानं त्याला बोलवून तीन पैशांत चिमटा दिला.

मुलांनी यात्रेत खूप मजा केली. खेळणी घेतली, मिठाई खाल्ली. हमीदनं मात्र स्वतःवर खूप ताबा ठेवला होता. त्याला आजीला खूश करायचं होतं. तो चिमटा घेऊन घरी परतला.



अमीनाआजी हमीदचा आवाज ऐकून लगेच बाहेर आली. त्याला कडेवर उचलून लाड करू लागली, एवढ्यात त्याच्या हातात चिमटा दिसला.

"हा चिमटा कुठून आणलास ?"

"मी विकत आणलाय."

"किती पैशांत ?"

"तीन पैसे दिले."

अमीनाबी एकदम दुःखी झाली. 'कसं पोरगं आहे. दुपार झालीय. न काही खाल्लं न प्याला. आणलंय काय तर चिमटा !'

"एवढ्या साऱ्या मेळ्यात तुला आणखी काही मिळालं नाही ? तू चिमटा उचलून आणलास तो !"

हमीद अपराधी भावनेनं म्हणाला, "तुझे हात स्वयंपाक करताना भाजतात न म्हणून आणलाय मी चिमटा !"

अमीनाआजीचा राग गायब झाला. 'दुसऱ्या पोरांनी मिठाई, खेळणी घेतलेली पाहून या पोरालाही वाटलं असेल घ्यावं. त्याचं मन किती लालचावलं असेल. एवढा त्यानं मनावर ताबा मिळवला कसा ? तिथे पण त्याला ह्या म्हाताऱ्या आजीची काळजी होती.' तिचं मन भरून आलं.

तिला रडू कोसळलं. पदर पसरून ती हमीदला आशीर्वाद देत होती. तिच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू गळत होते... आणि हमीद आजीच्या प्रेमळ कुशीत शिरला होता.

**मूळ लेखक – प्रेमचंद**

**अनुवाद – संजीवनी खेर**



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शब्दार्थ :** **ईदगाह –** प्रार्थनास्थळ. **रोजा –** सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत केलेला उपवास.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) गावात कशाची गडबड चालली होती ?
(आ) मुलांचा आनंद का उतू चालला होता ?
(इ) हमीदच्या घरी कोणकोण होते ?
(ई) नमाज संपल्यावर लोक काय करतात ?
(उ) अमीनाने दिलेल्या पैशाचे हमीदने काय घेतले ?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) ईदच्या दिवशीची सकाळ कशी आहे ?
(आ) ईदच्या दिवशी मुलांचा आनंद कसा आहे ?
(इ) हमीद कोणत्या आनंदात होता ?
(ई) ईदची प्रार्थना कशी चालते, त्याचे वर्णन करा.
(उ) ईदगाहजवळच्या मेळ्यात हमीदच्या मित्रांनी काय काय मौज केली ?
(ऊ) चिमट्याचे काय काय उपयोग होतात ?
(ए) हमीदने आणलेला चिमटा पाहून अमीनाआजीला काय वाटले ?

**प्र. ३. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) जणू तो साऱ्या जगाला ············ शुभेच्छा देत आहे.
(आ) हमीदचे अब्बा मागच्यावर्षी ·············· बळी गेले.
(इ) हमीदच्या खिशात ·············· पैसे आहेत.
(ई) दुकानदाराने आधी चिमट्याची किंमत ·············· पैसे सांगितली.

**प्र. ४. शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) आनंद उतू जाणे.
(आ) धुडकावून लावणे.
(इ) मन लालचावणे.
(ई) मनावर ताबा मिळवणे.

**प्र. ५. हमीदच्या घरी ईद साजरी केली जाते. तुमच्या घरी कोणते सण साजरे करतात ? त्यांतील कोणता सण तुम्हांला जास्त आवडतो ? तो कसा साजरा करतात ते आठ ते दहा ओळींत लिहा.**



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आम्ही सहलीला जातो

* वाचा. समजून घ्या.



गेला रविवार आम्ही अगदी मजेत घालवला. जेवणाचे डबे घेऊन सकाळी अगदी लवकर आम्ही शाळेत जमलो. आम्ही बसनं निघालो. बुलढाण्याहून दोन तासांत आम्ही लोणार तालुक्याला पोचलो.

लोणारला पोचल्यावर तिथल्या जगप्रसिद्‌ध सरोवराला जाण्याआधी आम्ही नाष्टा केला. लोणार सरोवराला आम्ही जाणार, हे कळल्यापासून वर्गात एकच चर्चा होती. आम्ही त्याविषयी घरच्यांना, शेजाऱ्यांना माहिती विचारत होतो.

सरोवराजवळ येताच आम्ही भराभर बसमधून बाहेर पडलो. तिथली माहिती सांगणारे गाइड आमची वाटच पाहत होते.

ते म्हणाले, ''मुलांनो, हजारो वर्षांपूर्वी उल्कापातामुळे हे सरोवर तयार झालंय. हे खाऱ्या पाण्याचं सरोवर आहे. आश्चर्य म्हणजे, एवढ्या खाऱ्या पाण्याच्या सरोवराभोवतालच्या विहिरींचं पाणी गोड आहे. अशा प्रकारचं हे भारतातलं एकमेव सरोवर आहे.''

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वरील चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. परिसरात अशा सहलींचे आयोजन करून विद्यार्थ्यांना त्यांचे अनुभव लिहायला सांगावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सरोवराभोवती सुंदर हिरवळ होती. करड्या रंगाचा काठ आणि त्यात हिरव्या-निळ्या रंगांचं पाणी अगदी मोहक दिसत होतं. सरोवर एवढं मोठ्ठं होतं, की बाईंनी दुर्बीण आणली नसती, तर पलीकडची झाडं, पक्षी आम्हांला दिसले नसते. आम्ही खाऊ-फळं आणली होती; परंतु आम्ही तिथे कचरा टाकला नाही. आजूबाजूचा परिसरही आम्ही स्वच्छ केला. बाईंनी आम्हांला शाबासकी दिली. आम्ही तिथे बराच वेळ खेळून परत निघालो.

बसमध्ये आम्ही निसर्गाच्या किमयेची चर्चा करत होतो.

**उपक्रम :** बुलढाणा जिल्ह्यातल्या एका शाळेतली मुले लोणार सरोवराला सहलीला गेली होती. त्यांनी केलेले सहलीचे वर्णन काळजीपूर्वक वाचा. तुमच्या परिसरातील निसर्गरम्य ठिकाणी सहलीला जा. तुम्ही भेट दिलेल्या ठिकाणाचे वर्णन दहा ते बारा ओळींत लिहा.

- **वाचा. उत्तर सांगा.**

एक प्राणी आहे असा
पायाविना चालतो कसा ?

रंग त्याचा असा तसा
लांब शेपटी, आहे छोटासा.

हालता हालता दावी गंमत
पडद्यावरती बघा करामत.

इशारा मिळताच पडद्यावर
खूण जाते खाली-वर.

खात नाही, पीत नाही
आवाज त्याचा होत नाही.

वीज गेली म्हणजे मात्र
थंड पडते याचे गात्र.

**- वि. ह. क्षीरसागर**

(उत्तर : संगणकाचा माउस.)



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १०. धाडसी हाली


पुरस्कारासह हाली बरफ

तुम्हांला कशाची भीती वाटते ? कोणी म्हणेल, 'झुरळांची.' कोणी म्हणेल, 'छट्, झुरळाला काय घाबरायचं ? आपण जवळ गेलो तरी ते पळून जातं.' कोणी म्हणेल, 'मला अंधाराची भीती वाटते.' त्यावर कोणी म्हणेल, 'अंधाराची भीती? त्यात काय असतं घाबरण्यासारखं ? दिवा लावला की अंधार गायब !' पण समजा तुम्हांला कोणी विचारलं, की 'तुमच्यासमोर एखादा वाघ किंवा बिबट्या उभा आहे, तर तुम्हांला काय वाटेल ?' 'छे! वाघाला काय घाबरायचं ?' असं म्हणायची हिंमत कोणी करेल ? नाही ना ? पण आपण अशा एका मुलीला भेटणार आहोत जी वाघाला घाबरून पळाली नाही. उलट तिने वाघापासून तिच्या बहिणीला वाचवले. हाली बरफ ही ती धाडसी मुलगी. या धाडसाबद्दल नवी दिल्ली येथे मा. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सन २०१३ मध्ये 'वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार' देऊन तिचा गौरव करण्यात आला.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात तानसा धरण आहे. या धरणाच्या परिसरात अभयारण्य आहे. तेथे विविध प्रकारचे जंगली प्राणी आहेत. या भागात वेगवेगळ्या पाड्यांवर आदिवासी राहतात. त्यांचे जीवन जंगलावर अवलंबून आहे. त्यामुळे जंगलात त्यांचा सतत आणि सहज वावर असतो. जंगलाची, तिथल्या प्राण्यांची त्यांना खडान्खडा माहिती असते. ते निर्भय असतात. जंगल ही आपली संपत्ती आहे. तिचे संवर्धन कसे करावे हे आदिवासी जाणतात.

तानसा धरणाच्या परिसरातील आटगावजवळ नांदगावच्या जमनाचा पाडा आहे. तेथे हाली बरफ ही मुलगी आपल्या कुटुंबासोबत राहत होती. निसर्गाच्या सहवासात लहानाची मोठी झालेली पाणीदार डोळ्यांची, सावळ्या रंगाची, काटक हाली बरफ ही वारली या आदिवासी समाजाची आहे. हालीचे वडील रघुनाथ हे रेल्वेत कामाला होते. एका अपघातात त्यांचा एक हात निकामी झाला. घरच्या गरिबीशी झुंज देणाऱ्या हालीने नेमके कोणते धाडस दाखवले ? चला, आपण तिच्याकडूनच ऐकूया. हालीची घेतलेली ही मुलाखत काळजीपूर्वक समजावून घ्या.

**प्रश्न** : तू जंगलात कशासाठी गेली होतीस ? तुझ्यासोबत कोण होतं ?

**हाली** : लाकरा आनाला गेलतू, माझे सोबत माझी मोठी बहीण (शकुंतला) होती. पाठीमागशी बहिणीवर वाघानं हल्ला केला. तिचं पाठीचा लचका तोरला. मांडी आनी पायाचा लचका कारला. बहीण जखमी झाली.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**प्रश्न** : तुझ्या बहिणीवर हल्ला केल्यावर तू काय केलंस ?

**हाली** : मी आधी घाबर-घाबरशी झालू. मग दगडं आपटली. लांब-लांबची लोकं आरडावरडा केलंवर धावत आली. मी जोरात मोठी-मोठी दगडं आपटली. वाघाला दगडं लागली. मंग वाघ पलून गेला.

**प्रश्न** : लोकांनी काय मदत केली ?

**हाली** : मी आरडावरडा केला. तवा काही लोक लाकरा गोला करीत होती. ती पन धावत आली.



**प्रश्न** : ही गोष्ट बाकीच्या लोकांना कशी समजली ?

**हाली** : गावच्या लोकांनी सांगला.

**प्रश्न** : तुझ्या जखमी बहिणीला कुठे नेलं ?

**हाली** : पयल्यांदा शहापूरचे दवाखानत नेली. मंग ठान्याचे सिविल हासपिटला नेली.

**प्रश्न** : तुझी बहीण वाचली का ?

**हाली** : बहीण वाचली.

**प्रश्न** : बहीण वाचली याबद्‌दल तुला काय वाटतं ?

**हाली** : आमाला बरा वाटला.

**प्रश्न** : तू बहिणीला वाचवलंस. त्यानंतर तुला कोणीकोणी मदत केली ?

**हाली** : आमचा मामा पांडु किरकिरे यानी लई मदत केली. गावचे लोक, शहापूरचे लोक यांनी सुदिक मदत केली. गावाचे शिक्षकांनी सुदिक मदत केली.

**प्रश्न** : तुझं पेपरात नाव आलं, बातमी छापून आली, तेव्हा तुला कसं वाटलं ?

**हाली** : चांगला वाटला.

**प्रश्न** : तू बहिणीला वाचवलंस, त्यामुळे तुला राष्ट्रीय शौर्य पुरस्कार मिळाला. तुला दिल्लीला येण्याचं आमंत्रण मिळालं. तू कोणासोबत दिल्लीला गेली होतीस ?

**हाली** : दिल्लीला माझे सोबत माझी आई, माझा मामा होता.

**प्रश्न** : दिल्लीला गेल्यावर तुला कसं वाटलं ? तेथील अनुभव सांग.

**हाली** : दिल्लीला गेलंवर चांगला वाटला. तिथं माझेसारखी दुसरी पन पोरा व्हती. काही पोरांची हत्तीवरशी मिरवणूक काढली. मी मोटारीशी फिरलू. चांगला खायाला मिलाला. खेलाला मिलाला. पंधरा दिस दिल्लीत व्हतू.

**प्रश्न** : तुला कोणाच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला ?

**हाली** : मला प्रधानमंत्र्यांनी पुरस्कार दिला.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**प्रश्न** : तू किती शिकलीस ?

**हाली** : मी शाळेन गेलू नाय. आमची गरिबी. कुटुंब मोठा, म्हनून शालेन गेलू नाय.

**प्रश्न** : तुझ्या धाडसाची घटना वाचणाऱ्या मुलामुलींना तू काय सांगशील ?

**हाली** : घाबरले नाय पायजे. लोकांना वाचवले पायजे.

**प्रश्न** : एवढा मोठा पुरस्कार तुला मिळाला. सगळ्यांनी तुझं कौतुक केलं. मग तुला काय वाटलं ?

**हाली** : मला चांगला वाटला. पन मला काम मिलाला असता, त जास्ती चांगला वाटला असता.

**प्रश्न** : सध्या तू काय करत आहेस ?

**हाली** : मी लग्न करून रातांधळे पाड्याला राहती. दिवसभर मोलमजुरी करती.

हालीचे आभार मानून आम्ही निघालो, तेव्हा तिचं धाडस, तिची परिस्थिती यांचाच विचार आमच्या मनात होता.

(या पाठ्यपुस्तकासाठी ही मुलाखत मराठी कार्यगट सदस्य प्रा. जयवंत पाटील यांनी घेतली आहे.)

**शब्दार्थ :** **अभयारण्य** – प्राणी किंवा पक्ष्यांसाठी राखून ठेवलेला जंगलाचा भाग. **लाकरा** – लाकडे, लाकूडफाटा. **आनाला** – आणायला. **गेलतू** – गेले होते. **पाठीमागशी** – पाठीमागून. **हाल्ला** – हल्ला. **लचका** – शरीराचा तोडलेला मांसल भाग. **तोरला** – तोडला. **आनी** – आणि. **कारला** – काढला. **घाबर–घाबरशी** – घाबरी. **झालू** – झाले. **दगडं आपटली** – दगडं मारली. **आरडावरडा** – आरडाओरडा. **केलंवर** – केल्यावर. **मंग** – मग. **पलून** – पळून. **गोला** – गोळा. **सांगला** – सांगितले. **पयल्यांदा** – पहिल्यांदा. **सिविल हासपिट** – सिव्हिल हॉस्पिटल, सरकारी इस्पितळ. **आमाला** – आम्हांला. **लई** – खूप. **सुदिक** – सुद्धा. **गेलंवर** – गेल्यावर. **पन** – पण. **दुसरी पोरा** – इतर मुलं. **फिरलू** – फिरले. **खायाला** – खाण्यासाठी. **खेलाला** – खेळण्यासाठी. **मिलाला** – मिळाले. **दिस** – दिवस. **व्हतू** – होते. **शालेन** – शाळेत. **गेलू** – गेले. **नाय** – नाही.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हालीला कोणता पुरस्कार मिळाला ?

(आ) हाली लाकडे गोळा करायला कुठे गेली होती ?

(इ) हालीच्या बहिणीवर कोणी हल्ला केला ?

(ई) हालीला दिल्लीला जाण्यासाठी कोणी मदत केली ?

(उ) हालीने कोणता संदेश दिला ?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

प्र. २. हालीने दाखवलेल्या धाडसाचे वर्णन करा.

प्र. ३. हालीला 'वीर बापूराव गायधनी' हा राष्ट्रीय शौर्य पुरस्कार का मिळाला ?

**उपक्रम :** राष्ट्रीय शौर्य पुरस्कार मिळालेल्या धाडसी मुलांची माहिती मिळवा. वाचा. वर्गात सांगा.



## चला, वाचूया.


### वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार

नाशिकमधील बापू गायधनी यांनी भीषण आगीतून लहान मुलांना आणि जनावरांना वाचवले. त्यासाठी त्यांनी स्वतःचा प्राण गमावला. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या त्यांच्या या अतुलनीय शौर्याच्या स्मरणार्थ, स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवणाऱ्या शूर मुलामुलींना 'वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार' दिला जातो. दरवर्षी असे जास्तीत जास्त तीन पुरस्कार दिले जाऊ शकतात.

'राष्ट्रीय बालकल्याण परिषदेच्या' वतीने दिले जाणारे हे शौर्य पुरस्कार स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीने दिले जातात. रोख रक्कम, पदक आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असते. कोणत्याही वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत पुरस्कारासाठी नावे पाठवावी लागतात.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. पुरस्कार मिळवणाऱ्या मुलांना प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात गौरवाने सहभागी करून घेतले जाते.

पुरस्कारप्राप्त मुलामुलींना गरज असल्यास त्यांच्या पुढील शिक्षणासाठी, तसेच व्यावसायिक उच्च शिक्षणासाठी परिषदेच्या वतीने मदत केली जाते. त्यासाठी या धाडसी मुलांची शिफारस जिल्हाधिकाऱ्यांमार्फत परिषदेकडे केली जाते.



वीर बापूराव गायधनी यांच्या शौर्याची काल्पनिक चित्रे





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ११. नाखवादादा, नाखवादादा...

• ऐका. म्हणा. वाचा.

नाखवादादा, नाखवादादा,
'खाडीपल्याड न्याल काय ?'
'खाडीपल्याड या वेळी,
सोन्या तुझे काम काय ?' ॥ १ ॥

खाडीपल्याड उंच डोंगर,
डोंगरावर हिरवे रान,
सकाळच्या कोवळ्या उनात,
दिसेल किती छान छान ! ॥ २ ॥

हिरव्या रानी शुभ्र ससे,
सशांचे डोळे लाल लाल.
त्यांना पाहून रागाने,
गुंजा आपले फुगवतील गाल. ॥ ३ ॥

फुलाफुलांत फुलपाखरे,
फुलपाखरांचे सोनेरी रंग.
उनात त्यांच्यासंगे न्हाती
पक्षी आपले फुलवून अंग. ॥ ४ ॥

पानापानांत दवबिंदू,
दवबिंदूंचे हिरे लाख.
कोवळ्या उनात झगमगती,
आभाळाचे निळे पाख. ॥ ५ ॥

आभाळात रंगीत ढग,
ढगांमागे इंद्रकमान.
कमानीवर घेऊन झोके,
पाहयची आहे खाडीची शान. ॥ ६ ॥

नाखवादादा, नाखवादादा,
'खाडीपल्याड न्याल काय ?'
'सोनसळ्या कवडशा,
न नेऊन चालेल काय ?' ॥ ७ ॥

नाखवादादा, नाखवादादा,
खाडीपल्याड नेण्यासाठी काय घ्याल ?
काही नको सोन्या मला,
पापीसाठी गुबरे गाल ! ॥ ८ ॥

– वसुधा पाटील





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शब्दार्थ :** **नाखवादादा** – तांडेल, नावाडी. **खाडीपल्याड** – खाडीच्या पलीकडे. **शुभ्र** – पांढरे. **गुंज** – लाल-काळ्या रंगाची बी. **पाख** – पंख. **कवडसा** – छोट्या जागेतून येणारा सूर्यप्रकाश.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) या कवितेत कोण कोणाशी बोलत आहे ?
(आ) कवितेतील मुलाला नाखवादादा कोणत्या नावाने हाक मारतो ?
(इ) हिरव्या रानात कोण आहे ?
(ई) पानापानांत कोण लपले आहे ?
(उ) मुलाला कशावर झोके घ्यायचे आहेत ?
(ऊ) नाखवादादा शेवटी मुलाला काय म्हणतो ?

**प्र. २. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) सशाचे डोळे | (अ) सोनेरी रंग |
| (२) फुलपाखरांचे | (आ) लाख हिरे |
| (३) दवबिंदूंचे | (इ) लाल लाल |

**प्र. ३. खालील ओळी वाचून चित्र काढा.**

(अ) फुलाफुलांत फुलपाखरे
फुलपाखरांचे सोनेरी रंग.

(आ) ढगांमागे इंद्रकमान.
कमानीवर घेऊन झोके,
पाह्यची आहे खाडीची शान.

**प्र. ४. तुम्ही काय कराल, ते सांगा.**

(अ) नदीकाठावर उभे राहून.
(आ) उन्हात गेल्यावर.
(इ) पावसात भिजल्यावर.
(ई) बागेतील फुले पाहिल्यावर.
(उ) आकाशातले चांदणे पाहताना.
(ऊ) थंडीने गारठून गेल्यावर.

**उपक्रम :**

१. रंगीबेरंगी फुलपाखरांची चित्रे काढा.
२. फुलपाखरांच्या कवितांचा संग्रह करा.
३. वेगवेगळ्या प्रकारच्या होड्या बनवा.
४. एखाद्या वाहनचालकाची भेट घ्या. त्याच्या कामाची माहिती घ्या. वाहनचालकाला त्याचे काम करताना आलेले अनुभव वर्गात सांगा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आम्ही खेळ खेळतो













**शिक्षकांसाठी :** वरील खेळ कसे खेळतात याविषयी वर्गात चर्चा करावी. असे खेळ शाळेत घ्यावे. विद्यार्थ्यांना 'तुम्ही यांसारखे कोणकोणते खेळ खेळता', हे विचारावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १२. वाटाड्या

''काका, काका...'' आवाज आला. कोणीतरी त्याला हालवत होतं. स्पर्श कोवळा, नाजूक होता. हाताची बोटंही इवलीशी.

''काका, काकाऽऽ'' त्या छोट्या मुलीने त्यांना पुन्हा हाक मारली. तसा तो पटकन तिच्या बाजूला वळला. ती म्हणाली –

''काका, मला किनई खूप भीती वाटते.''

''कशाची भीती?'' काकांनी विचारले.

''मला रस्त्याची भीती वाटते.'' मुलगी म्हणाली.

''रस्ता काय वाघ-सिंह आहे – खाऊन टाकायला ?'' काका म्हणाले.

''वाघसिंह नाही हो – पण केवढी रहदारी असते रस्त्यावर ! मोटारी, स्कूटर, मधेच शिट्टी वाजवणारा पोलीस. कोणी कुठूनही भर्रकन येतं. मघा तर मी त्या सायकलच्या चाकातच जात होते.''

''अरेरे !... पण असं रस्त्याला घाबरून कसं चालेल ? बाहेर तर जावंच लागतं ना?''



''हो ना काका. बाहेर जाताना आई, बाबा असतातच बहुतेक माझ्याबरोबर, तेव्हा मला नाही भीती वाटत रस्त्यांची ! आई किंवा बाबांचं बोट धरलं की भीती गायब. अगदी ऐटीत चालते मी त्यांच्याबरोबर.'' मुलगी म्हणाली.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

''अस्सं. मग आता नाही वाटतं कोणी बरोबर ? तुला शाळेत पोहोचवायला, घरी न्यायला येत नाही कोणी ?'' काकांनी विचारले.

''येतं ना ! बाबा सकाळी शाळेत पोहोचवतात अन् मग तसेच ऑफिसला जातात. आमचा गडी सखाराम दुपारी येतो न्यायला.'' मुलगी म्हणाली.

''मग आज नाही आला तो ?'' काका.

''नाही नाऽऽ ! तो सुट्‌टीवर आहे आज !''

''मग तू घरी कशी जाणार ?'' काकांनी विचारले.

''मला घर माहीत आहे. सखारामबरोबर रोज जाते ना, तेव्हा सगळा रस्ता पाहून ठेवलाय मी. तो बघा, समोरच्या त्या उंच इमारतीवर मोठ्ठा टीव्ही काढलाय ना, तिथून वळायचं. मग मोठ्ठं मैदान लागतं. तिथं एक बेकरी आहे. बेकरीजवळून अगदी सरळ गेलं ना काका, की येतं माझं घर.''

ती नीट समजावून सांगत होती. त्या धिटुकलीच्या बोलण्याची त्या काकांना गंमत वाटत होती.

''नाव काय बेटा तुझं ?'' त्यांनी मध्येच विचारले.

''माझं नाव आहे मृणालिनी, पण सगळे मला मिनू म्हणतात. काका, तुम्हीपण मिनूच म्हणा.''

''बरं, पण काय गं मिनू, आईनं तुला एकटंच यायला सांगितलं ?''

''नाही हो, एकटं नाही. आमच्या घराजवळ राहणारी सोनल आहे ना, तिच्याबरोबर यायला सांगितलं होतं.''

''मग सोनल कुठे आहे ?''

''ऊं ! ती गेली मघाशीच. भारी शिष्ट आहे ती ! ती मला चल म्हणत होती, पण मलाच राग आला. किती टिंगल केली तिनं माझी ? मी म्हटलं, मला नाही यायचं तुझ्याबरोबर. तू जा. मला माहीत आहे माझं घर.''

''मग काय म्हणाली ती ?'' – काकांनी विचारले.

''ती म्हणाली जा. रस्त्यात घाबरशील. मग येईल तुझी आई मला विचारायला.'' मिनू म्हणाली.

''पण तुला तर रस्त्याची भीती वाटते ना ?'' काका.

''अहो, फक्त रस्ता ओलांडताना जीव घाबरतो. वाटतं, सगळ्या गाड्या आपल्याच अंगावर येत आहेत.''

ते हसले.


''काका, तुम्ही मदत कराल ? बोट धराल माझं ? – फक्त पलीकडे जाण्यापुरतं. मग जाईन मी माझी. मला माहीत आहे पुढचा रस्ता.''

मिनू उत्साहाने बोलत होती. तिच्या आवाजात आर्जव होते. काकांची छाती मात्र धडधडू लागली होती.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



''चला ना काका !.... प्लीऽऽज !'' मिनू म्हणाली.

मिनूच्या आवाजातल्या आर्जवीपणामुळे काकांना गलबलून आले. काय सांगावे या भोळ्या, लहानग्या जिवाला हे त्यांना समजेना; पण तोपर्यंत तिने काकांचा हात पकडला होता आणि ती त्यांना चलायचा आग्रह करत होती. तिच्या स्पर्शातला भोळा विश्वासच त्या काकांना नवे बळ देत होता.

''हे बघ, रस्ता क्रॉस करताना घाबरायचं मुळीच नाही. आधी झेब्रा क्रॉसिंग कुठे आहे ते बघायचं.'' काका म्हणाले.

''म्हणजे रस्त्यावरचे ते पांढरे पट्टे ना?''

''हो तेच. दाखव बरं कुठं आहेत ?'' डोळ्यांवरचा काळा चश्मा ठीक करत काका म्हणाले.

''हे बघा इकडे आहेत.'' मिनूने ओढतच काकांना झेब्रा क्रॉसिंगजवळ आणले.

''शाबास ! आता पलीकडे जाताना आणखी एक काळजी घ्यायची'', काका सांगत होते. ''दोन्ही बाजूंनी येणारी वाहनं नीट पाहायची. आधी उजवी बाजू पाहायची. मोटार, स्कूटर येत नसेल तर पुढे जायचं. मग अर्ध्या रस्त्यातून दुसऱ्या बाजूनं येणारी वाहनं पाहायची. त्यांच्याकडे नीट लक्ष देत आपलं पाऊल उचलायचं. समजलं ?''

''हो !'' म्हणून मिनूने खुशीत मान डोलावली.

''आणखी एक करायचं.''



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

"काय ?"

"रस्त्यातून कधीही धावत सुटायचं नाही."

"समजलं मला. चला ना आता."

"अंहं. एकदम नाही. आधी नीट बघ उजव्या हाताला आणि मला सांग एखादी गाडी येते का ते !"

"उजव्या हाताला ना ? त्या पहा दोन कार येत आहेत अन् स्कूटर तर भरधावच आहे."

"मग थांब... आता? गेल्या ना त्या ?"

"हो. आता कोणी नाही इकडे. एक गाडी येते आहे, पण ती खूप दूर आहे."

"वा ! मग चल तर."

दोघांनीही अर्धा रस्ता पार केला. मग काकांनी परत तिला असेच प्रश्न विचारले अन् रस्ता मोकळा सापडताच दोघेही पलीकडे आली. पलीकडे येताच मिनूने जोरात टाळ्या वाजवल्या. ती फार खुशीत होती.

"वा ! तुम्ही किती चांगले आहात काका ! किती छान शिकवलं तुम्ही मला ! आता रस्ता क्रॉस करताना मला नाही भीती वाटणार... काका, आता मी जाऊ घरी?"

"जा बेटा. पण नीट जाशील नं ?"

"हो अगदी नीट जाईन. तो बघा टीव्ही काढलाय तिकडे माझं घर आहे. दिसलं ना ?" मिनू विचारत होती. काकांनी मान उंचावली.

"तिकडे नाही हो. इकडे – या बाजूला." हाताला धरून काकांना तिरपे वळवत मिनू म्हणाली.

"आता दिसला ना?"

"हो." म्हणून काकांनी खुशीने मान हालवली.

"आता मी जाते हं."

"जा बेटा, नीट सांभाळून जा."

"वा ! नीट जायला तर तुम्हीच शिकवलं मला काका. मी सांगते आईला. अच्छा ! ठीक आहे."

"बाय मिनू." काकांनी हात उंचावून हालवला. कितीतरी वेळ ते हात हालवतच होते.

कोणाचा तरी धक्का लागला. काका भानावर आले. डोळ्यांवरचा काळा चश्मा काढला. खिशातल्या रुमालाने एकदा त्यांनी आपले डोळे टिपले. मग समोरून येणाऱ्या माणसाची चाहूल लागली. ते आर्जवाने म्हणाले, "मला दिसत नाही, पलीकडे पोहोचवता का ?"

समोरच्या माणसाने त्यांचा हात पकडला अन् त्याच्या मागोमाग 'काका' निमूटपणे चालायला लागले.

**– शैलजा काळे**



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शब्दार्थ :** **इवलीशी** – लहानशी. **आर्जव** – विनंती. **गलबलून येणे** – मन भरून येणे. **चाहूल लागणे** – कुणीतरी येण्याची जाणीव होणे. **निमूटपणे** – गुपचूप, काहीही न बोलता.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मिनू कशाला घाबरत होती ?

(आ) मिनूला दररोज शाळेत कोण पोहोचवत असे ?

(इ) रस्त्यावरील पांढऱ्या पट्ट्यांना काय म्हणतात ?

(ई) 'मिनूला रस्ता ओलांडायला मदत करणाऱ्या काकांना दिसत नव्हते.' हे पाठातील कोणत्या वाक्यावरून कळते ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) आई किंवा बाबांचं बोट धरलं, की भीती ........... .

(आ) माझं नाव आहे ................. , पण सगळे मला मिनू म्हणतात.

(इ) मिनूच्या आवाजातल्या ................. काकांना गलबलून आले.

(ई) आता रस्ता क्रॉस करताना मला नाही ................. वाटणार.

**प्र. ३. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) "मग आज नाही आला तो ?"

(आ) "रस्त्यातून कधीही धावत सुटायचं नाही."

(इ) "तिकडे नाही हो. इकडे, या बाजूला."

**प्र. ४. पाठात आलेल्या इंग्रजी शब्दांना मराठीत काय म्हणतात ते लिहा.**

(अ) प्लीज (आ) क्रॉस (इ) टीव्ही

**प्र. ५. स्वतःला दिसत नसूनही काकांनी मिनूला रस्ता ओलांडायला कशी मदत केली ते पाच-सहा वाक्यांत लिहा.**

**प्र. ६. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा.**

(अ) काकांनी मिनूला मदत केली, तशी तुम्ही कोणाकोणाला मदत केली ? कशी मदत केली ?

(आ) अंध व्यक्ती, मुले-मुली स्वतःची कामे स्वतः करतात, म्हणजे ते स्वावलंबी असतात. तसे तुम्ही स्वावलंबी आहात का ?

असल्यास – तुम्ही स्वतःची कोणकोणती कामे स्वतः करता ?

नसल्यास – स्वावलंबी होण्यासाठी तुम्ही काय काय कराल ?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**प्र. ७. तुम्ही कधी भीतिदायक सिनेमा पाहिला आहे का ? चौथीतल्या जिग्नेशने असा एक सिनेमा पाहिला. तो सिनेमा पाहताना त्याला काय वाटले ते त्याने लिहिले आहे. कंसातील योग्य शब्द वापरून त्याचे लेखन पूर्ण करा.**

(कानाचा, घसा, श्वास, डोळे, कानठळ्या, छाती, जीव, पाय)

सिनेमाच्या सुरुवातीला अगदी शांत रस्त्यावर एक मुलगा चाललेला होता. सगळं इतकं शांत होतं की आपल्या ....... घेण्याचाही आवाज यावा आणि एकदम एक......... बसवणारी किंकाळी ऐकू आली. ...... पडदा फाटतो की काय असं वाटलं. सिनेमात एक भली मोठ्ठी घार उडत आली आणि त्या छोट्या मुलाच्या अगदी जवळून गेली. माझी ......... जास्त जोरात धडधडू लागली. आई-बाबांच्या मधे बसून मी सिनेमा पाहत होतो, पण तरीही .... कोरडा पडला. मध्यंतराआधीचे गुहेतल्या पाठलागाचे दृश्य पाहून तर .... लटलटा कापू लागले. भीतीने ..... पांढरे पडू लागले, पण सिनेमा पाहायचाच होता. हे सगळं पडद्यावर चालतंय, काल्पनिक आहे हे माहिती होतं. तरीही मध्यंतर होईपर्यंत मी ............. मुठीत घेऊन बसलो होतो.

**प्र. ८. खालील प्रसंग तुमच्यावर कधी आले होते का ? त्या वेळी तुम्हांला काय वाटले ? तुम्ही काय केले ?**

(अ) रस्त्यावरून चालताना एखादे वाहन पाठीमागून भर्रकन आले, जवळून गेले.

(आ) रस्ता ओलांडताना एखाद्या अनोळखी माणसाने तुमचा हात पकडला. तुम्हांला त्याच्याबरोबर चालायला सांगितले.

**उपक्रम :**

१. तुमच्या परिसरातील मूकबधिर/अंध शाळेला भेट द्या. माहिती मिळवा. वर्गात सांगा.

२. तुमच्या आईला काम करताना पाहून तुमच्या मनात काय येते, ते वर्गात सांगा.



## वाचा.

**मावशी** : अरे राजू, मोटारीनं तुला धडक दिली म्हणे.

**राजू** : हो. त्या वेळी मी रस्त्यावरचा फलक वाचत होतो.

**मावशी** : काय लिहिलं होतं त्या फलकावर?

**राजू** : रस्त्यावरचे अपघात टाळण्याचे उपाय !



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १३. चवदार तळ्याचे पाणी

- ऐका. म्हणा. वाचा.

चवदार तळ्याचे पाणी,
नवशक्ति मानवा आणी.

या शक्तीमागे मूर्ती,
भीमकाय देई स्फूर्ती,
जणू मुक्यास दिधली वाणी,
चवदार तळ्याचे पाणी.

तेजाब जलाचे झाले,
दीनांना प्रेरित केले,
अन्यायासाठी लढुनी,
नवशक्ति मानवा आणी.

नाकारुन परंपरेला,
स्वीकारुन मानवतेला,
करुणेची आर्त विराणी,
चवदार तळ्याचे पाणी.

आत्मभान जागे केले,
मानवास मीपण दिधले,
धम्मचक्र ये परतोनी,
नवशक्ति मानवा आणी.

चवदार तळ्याचे पाणी,
नवशक्ति मानवा आणी.

**– अनुराधा साळवेकर**



*चित्रकार-श्री. सुंदर लाल. शांतिस्वरूप बौद्ध, सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली-६३, यांच्या सौजन्याने.*



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शब्दार्थ :** **दिधली** – दिली. **तेजाब** – एक तीव्र रसायन, आम्ल. शरीराच्या ज्या भागावर पडेल, त्या भागाला इजा होते. **आर्त** – व्याकूळ करणारी. **विराणी** – दु:खी गाणे. **आत्मभान** – स्वत:बद्‌दची जाणीव.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) चवदार तळ्याच्या पाण्याने कोणाला नवीन शक्ती दिली ?
(आ) चवदार तळ्याच्या पाण्यातील शक्तीमागे कोणाची स्फूर्ती आहे ?
(इ) चवदार तळ्याच्या पाण्याने कोणाला प्रेरित केले ?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) 'अन्यायासाठी लढुनी' असे कवयित्री का म्हणते ?
(आ) आत्मभान कशामुळे जागे होते ?

**प्र. ३. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.**

(नाकारायचे, स्वीकारायचे, लढायचे, प्रेरित करायचे, जागे करायचे)

(अ) दीनांना ............... .
(आ) मानवतेला ............... .
(इ) अन्यायाविरुद्ध............... .
(ई) परंपरेला............... .
(उ) आत्मभान ............... .

**प्र. ४. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) भीमकाय | (अ) लढा |
| (२) मुक्यास | (आ) स्फूर्ती |
| (३) दीनांना | (इ) नकार |
| (४) अन्यायविरोधी | (ई) वाणी |
| (५) परंपरेला | (उ) प्रेरणा |

**प्र. ५. समानार्थी शब्द द्या.**

(अ) पाणी (आ) वाणी (इ) शक्ती (ई) दीन

**प्र. ६. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) स्फूर्ती (आ) दीन (इ) मानवता (ई) शक्ती (उ) दिन

**प्र. ७. 'ता' प्रत्यय लावून नवीन शब्द लिहा.**

उदा., मानव – मानवता.

(अ) सुंदर (आ) मधुर (इ) नादमय

**उपक्रम :**

१. समाजसुधारकांच्या चित्रांचा संग्रह करा.
२. तुमच्या गावातल्या पाणवठ्यांविषयी माहिती सांगा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## चला, वाचूया.

### चवदार तळ्याचा सत्याग्रह

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात 'चवदार तळे' नावाचे एक तळे आहे. स्वातंत्र्यापूर्वी या तळ्यावर इतर ठिकाणांप्रमाणे दलितांना पाणी भरण्याची बंदी होती. 'सर्व लोकांना पाणी मिळावे' असा कायदा करूनही जातिभेदांमुळे दलितांना चवदार तळ्याच्या पाण्याला हात लावण्याची देखील मनाई होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या जुलमी रूढीचा धिक्कार केला. 'चवदार तळे' सर्वांना खुले व्हावे, म्हणून त्यांनी महाड येथे सत्याग्रह केला. हजारो लोकांच्या उपस्थितीत २० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी स्वतः तळ्याचे पाणी पिऊन एक अन्यायी परंपरा संपवली. दलितांबरोबर सवर्ण सुधारक देखील या लढ्यात सहभागी झाले होते. अस्पृश्यता पाळणे, माणसांनी एकमेकांना हीन लेखणे अशा विषमतेच्या परंपरांना डॉ. आंबेडकरांनी संघटित विरोध केला. स्त्रियांना, दलितांना समतेने, समानतेने जगण्याचा हक्क मिळावा म्हणून त्यांनी आयुष्यभर अपार संघर्ष केला. 'चवदार तळे' ही जागा अशाच एका प्रसंगाची साक्षीदार आहे.

'चवदार तळ्याचा सत्याग्रह' ही घटना भारताच्या इतिहासातील एक प्रेरणादायी घटना मानली जाते.

- गोलातील शब्द वाचा. शब्दांतील संबंध समजून घ्या. 'निसर्ग आपला सोबती' या विषयावर आठ ते दहा ओळींत निबंध लिहा.

सूर्य
उष्णता

समुद्र
वाफ

माणसे
पशुपक्षी

ढग
थंड हवा

शेते
पिके
जंगले

पाणी
पाऊस

नदी
धरण



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १४. मिठाचा शोध



फार फार वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. इतक्या पूर्वीची, की त्या काळी माणूस जंगलामध्ये गुहेत राहत असे आणि कंदमुळं खाऊन पोट भरत असे. शिकार करून प्राण्यांचं मांस खात असे. त्याला अन्न शिजवून किंवा भाजून खाणं, हे माहीत नव्हतं. इतकंच काय, पण तो कंदमुळं खात असे तीही तशीच अळणी म्हणजे मिठाशिवायच. आज आपण एखादा पदार्थ मिठाशिवाय खाऊ शकणार नाही; पण त्या काळी मीठ म्हणजे काय हेही त्याला ठाऊक नव्हतं.

एके दिवशी असंच जंगलामध्ये भटकताना एका आदिमानवानं काही हरणांना ठरावीक जागी एका झाडाच्या बुंध्यापाशी असणाऱ्या दगडांना चाटताना बघितलं. बरेच दिवस त्यानं या गोष्टीचं निरीक्षण केलं. त्याला खूप आश्चर्य वाटलं. मग त्याच्या मनात कुतूहल जागृत झालं. 'काय असेल बरं हे ? ही हरणं रोज का बरं या जागी हे दगड चाटतात? आपणही बघूयात का चाटून ?'

त्याच्या मनात शंका आली आणि लगेच शंकेचं समाधान करण्यासाठी त्यानं तेच दगड चाटून पाहिले, तर काय ! एक वेगळीच, पण मजेदार चव त्याच्या जिभेवर रेंगाळायला लागली. त्याला ती खूप आवडली. तो रोज त्या जागी येऊन तो दगड चाटू लागला.

तो दगड म्हणजे काय होतं हे माहीत आहे का तुम्हांला ? तो होता खनिज मिठाचा दगड. खनिज मीठ म्हणजे ज्याला आपण 'सैंधव मीठ' म्हणतो.

त्यानंतर त्याला एक युक्ती सुचली. त्या दगडाचे त्यानं तुकडे केले. ते तुकडे आपल्या गुहेत नेऊन ठेवले आणि कंदमुळं खाताना रोज थोडा थोडा दगड चाटू लागला. त्याला आता जेवणात खूप मजा येऊ लागली. हाच दगड फळं खातानाही तो चाटू लागला. असे खूप दिवस गेले आणि एके दिवशी ते तुकडे संपले. मग त्यानं आधीच्या जागेवरून आणखी दगड आणले; पण त्या दगडांना पूर्वीची चव नव्हती. मग त्या आदिमानवाला पुन्हा बेचव, अळणी जेवण खाणं भाग पडू लागलं. आता त्याला शांतपणे बसून राहवेना. त्या दगडाचा शोध घेण्याचा त्यानं खूप प्रयत्न केला; पण तो दगड काही त्याला मिळाला नाही. आता काय बरं करावं ! असा विचार करताना चालत चालत तो त्या जंगलाच्या टोकापाशी म्हणजे जिथे जंगल संपतं अशा जागेवर येऊन ठेपला.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

त्याला दिसली एक वेगळ्या प्रकारची माती. ती खूप लांबवर पसरलेली होती आणि त्या मातीनंतर पाणीच पाणी खूप लांबवर पसरलं होतं, की तिथे जाणं शक्यच नव्हतं. त्याला पुन्हा कुतूहल वाटलं.

ते लांबवर पसरलेलं पाणी म्हणजे होता अथांग समुद्र आणि ती वेगळ्या प्रकारची माती म्हणजे वाळूनी भरलेला समुद्राचा किनारा, जो या आदिमानवानं प्रथमच पाहिला होता.

तो चालत चालत त्या समुद्राच्या पाण्यात गेला आणि काय आश्चर्य ! ते पाणी त्याच्या हातापायांना झोंबू लागलं. का, माहीत आहे ? आदिमानवाच्या हातांना आणि पायांना बरंच खरचटलं होतं. जंगलातले काटेकुटे, दगड यांमुळे पायांना बऱ्याच जखमाही झाल्या होत्या. त्यामुळे समुद्राच्या पाण्यामुळे झोंबणं सुरू झालं. त्याला आश्चर्य वाटलं, कारण नदीचं पाणी तर त्याला माहीत होतं, पण ते असं कधी अंगाला झोंबलं नव्हतं. मग पुन्हा त्यानं त्यावर विचार करायला सुरुवात केली. त्यानं थोडं पाणी पिऊनही पाहिलं आणि काय आश्चर्य ! ती चव त्याला ओळखीची वाटली. त्याला खूप आनंद झाला. खनिज मिठाचा जो दगड त्यानं चाटला होता, तशीच चव या पाण्याची होती.

मग त्यानं विचार केला. जेवण म्हणजे कंदमुळं. ती खाताना मधूनमधून हे पाणी प्यायलं तर? पण ते काही त्याला जमेना. ती चव त्याला हवी होती. ते पाणी त्याच्या गुहेपर्यंत नेणंही त्याला शक्य होत नव्हतं. 'काय बरं करावं !' मग पुन्हा त्यानं विचार करायला सुरुवात केली.

त्याला एक युक्ती सुचली. त्यानं समुद्रकिनाऱ्यावर जरा लांब एक खड्डा खणला. त्यात समुद्राचं पाणी साठवलं. मग उन्हामुळे त्या पाण्याची वाफ झाली आणि त्या पाण्यातले क्षार म्हणजे सध्याचं आपण खातो ते मीठ, त्या खड्ड्याच्या तळाशीच राहिलं. मग त्या आदिमानवाला ते सहज आपल्या गुहेत नेता आलं. यानंतर आदिमानवाच्या जेवणाला मस्त चव आली !

(काल्पनिक) **– अंजली अत्रे**

**शब्दार्थ :** **अळणी** – मिठाशिवाय बनवलेले व चव नसलेले. **कुतूहल** – उत्सुकता, एखादी गोष्ट जाणून घेण्याची इच्छा. **युक्ती** – कल्पना.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पूर्वीच्या काळी माणूस कुठे राहत असे ?

(आ) आदिमानवाने हरणांच्या कोणत्या गोष्टीचे खूप दिवस निरीक्षण केले ?

(इ) खनिज मिठाला आपण काय म्हणतो ?

(ई) माणसाने समुद्राचे पाणी कशात साठवले ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) बरेच दिवस त्यानं या गोष्टीचं ............. केलं. त्याला खूप ............ वाटलं.

(आ) कंदमुळं खाताना रोज थोडा थोडा ................... चाटू लागला.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

(इ) त्याला दिसली एक वेगळ्या प्रकारची ............ .

(ई) ते पाणी त्याच्या ............... नेणंही त्याला शक्य होत नव्हतं.

**प्र. ३. का ते सांगा.**

(अ) आदिमानवाने दगड चाटून पाहिला.

(आ) समुद्राचे पाणी आदिमानवाच्या हातापायांना झोंबू लागले.

(इ) समुद्रकिनाऱ्यावर आदिमानवाने लांब खड्डा खणला.

**प्र. ४. तुमचे अनुभव लक्षात घेऊन सारणीत योग्य नावे लिहा.**

| कच्चे खाल्लेले पदार्थ | भाजून खाल्लेले पदार्थ | शिजवून खाल्लेले पदार्थ |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

**प्र. ५. कोणकोणते पदार्थ कच्चे खाणे अधिक चांगले असते, याविषयी माहिती मिळवा.**

**प्र. ६. हा खेळ खेळा. डोळ्यांवर रुमालाची पट्टी बांधा. नाकाने वास घ्या. पदार्थ ओळखा. त्यांची चव कशी असते ते लिहा. उदा.,** मिरची – तिखट.

**प्र. ७. समानार्थी शब्द लिहा.**

(अ) जंगल (ई) दिवस


(आ) झाड (उ) समुद्र

(इ) लांब (ऊ) पाणी

**प्र. ८. खालील शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) निरीक्षण करणे. (आ) कुतूहल वाटणे. (इ) अंगाला झोंबणे.

**प्र. ९. 'मीठ' या शब्दासोबत बाणाने दाखवलेला एक-एक शब्द घेऊन वाक्प्रचार तयार करा. त्याचा अर्थ समजावून घेऊन वाक्यात उपयोग करा.**




**शिक्षकांसाठी :** या कथेत एका आदिमानवाचा उल्लेख आलेला आहे; पण मिठाचा शोध एकाच आदिमानवाने लावला, असा त्याचा अर्थ घेऊ नये. माणसाच्या अन्नघटकांचा शोध पिढ्यान्‌पिढ्या चालू राहिला, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## निमंत्रण पत्रिका

• **वाचा**

पाळंदूरच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देण्यासाठी गावकऱ्यांना निमंत्रण दिले आहे. ग्रामपंचायत कार्यालयाजवळच्या सूचना फलकावर चौथीच्या मुलांनी काय लिहिले आहे ते काळजीपूर्वक वाचा.

### जाहीर निमंत्रण

**पाळंदूरमधील सर्व लोकांसाठी**

दरवर्षीप्रमाणे आपल्या शाळेत, म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाळंदूर येथे 'मुलांचा दिवस' या उपक्रमाअंतर्गत प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांनी बनवलेल्या विविध वस्तू व भेटकार्डे, रेखाटलेले तक्ते, मातीकाम, चित्रे आणि शाळेच्या बागेत फुलवलेल्या भाज्या व फळे यांची प्रदर्शनी भरवली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी लाखनीवरून 'विदर्भ आनंदशिक्षण मंडळा'चे कार्यकर्ते श्री. बालसू नागोटी आणि श्रीमती सुवर्णाताई गजभिये उपस्थित राहणार आहेत. ते कलाकुसरीच्या वस्तू बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवतील. तरी आपण सगळ्यांनी उपस्थित राहून आमचा उत्साह वाढवावा, ही विनंती.

**शनिवार, दि. ....................**

**ठिकाण**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाळंदूर.

**प्रदर्शनीची वेळ :** सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००

**प्रात्यक्षिक :** सकाळी ११.३० ते दुपारी १.३०

*** खास आकर्षण ***
**गेल्या वर्षीच्या सहलीची वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रे.**

आपले
**सर्व विद्यार्थी, इयत्ता चौथी**
**जि.प.प्रा. शाळा, पाळंदूर.**

**शिक्षकांसाठी :** १. येथे जाहीर निमंत्रण पत्रिकेचा नमुना दिला आहे. तो शिकवताना जवळच्या एखाद्या शनिवारचा दिनांक घालून शिकवावे. २. पाळंदूर भागात 'प्रदर्शन' या शब्दासाठी 'प्रदर्शनी' हा शब्द वापरतात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र. १. निमंत्रण पत्रिका काळजीपूर्वक वाचा. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) निमंत्रण कोणी दिले आहे ?

(आ) कार्यक्रमाचे स्वरूप काय आहे ?

(इ) कार्यक्रमासाठी पाहुणे कोठून येणार आहेत ?

(ई) या निमंत्रणाला 'जाहीर निमंत्रण' असे का म्हटले आहे ?

(उ) असा कार्यक्रम पाळंदूरच्या शाळेत गेल्या वर्षी झाला असेल का ? ते कशावरून समजले ?

(ऊ) निमंत्रण वाचून प्रियंकाची आई म्हणाली, ''बरं झालं. दिवसभर शाळेत थकली, तरी मुलांना दुसऱ्या दिवशी विश्रांती मिळेल.'' त्या असे का म्हणाल्या असतील ?

(ए) समजा, असे प्रदर्शन तुमच्या शाळेत भरवायचे आहे. त्यासाठी काय काय तयारी करावी लागेल ? आपापसात तसेच शिक्षकांशी चर्चा करून उत्तर लिहा.

(ऐ) तुम्हांला असे निमंत्रण गावकऱ्यांना द्यायचे असेल, तर तुम्ही 'खास आकर्षण' म्हणून काय काय लिहाल ?

**प्र. २. प्रदर्शनामधील खालील प्रसंगांमध्ये मुले काय बोलत आहेत, याची कल्पना करून उत्तरे लिहा. गरज वाटल्यास शिक्षकांशी चर्चा करा.**

(अ) प्रदर्शन पाहून आलेली रत्ना तिच्या आजीला प्रदर्शनाविषयी सांगते आहे.

(आ) प्रदर्शन सुरू झाल्यावर तासाभराने खूप गर्दी झाली. काही लोक मधेच घुसू लागले. त्यांनी रांगेत येऊन प्रदर्शन पाहावे, म्हणून राकेश सूचना देतोय.

(इ) सविता प्रमुख पाहुण्यांना प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यासाठी विनंती करते आहे.

(ई) कलाकुसरीच्या वस्तूंच्या प्रात्यक्षिकाच्या वेळी सुवर्णाताईंनी मुलांना सहा-सहाचे गट करायची सूचना दिली.

- **खालील चित्रांमध्ये काय योग्य, काय अयोग्य ते सांगा.**





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १५. आनंदाचं झाड

आमच्या शेवग्याला सुंदर, हिरवट पोपटी नाजूक पालवी फुटली होती. झाड जोमानं उंच उंच वाढत होतं. नाजूक पानांची हिरवी नक्षीदार जाळी पसरली होती. काही फांद्यांना मोहोर फुलला होता. पांढऱ्या रंगाच्या फुलांचे घोसच्या घोस झाडांवर लोंबत होते. हिरव्यागार झाडाला पांढऱ्याशुभ्र फुलांचा फुलोरा उठून दिसत होता. आमचा शेवगा खूप छान बहरला होता. येणाऱ्या-जाणाऱ्यांची नजर त्यावर पडल्याशिवाय राहत नव्हती. एके दिवशी आमच्या घरी शेजारच्या काकू आल्या अन् म्हणाल्या, ''दारात कधीही शेवगा लावू नये. घरात भांडणं होतात. हे झाड तुम्ही तोडून टाका.''

इतकं सुंदर झाड अन् तोडून टाका ! मला जरा त्या काकूंचा रागच आला. मी काही म्हणायच्या आतच आई म्हणाली, ''झाडं ती, सगळी सारखीच. उलट झाडं किती परोपकारी असतात. ती का बरं आपल्यात भांडणं लावतील? आपण माणसंच असा विचार करतो. झाडं तर आपल्याला फळं देतात, फुलं देतात, सावली देतात, पक्ष्यांना घरं देतात. आधार देतात. मी हे झाड लावलं ते जोपासण्यासाठी, तोडण्यासाठी नाही.''





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

काकू म्हणाल्या, ''अहो, लोक शेंगा तोडून नेतील, तेव्हा नाही का भांडणार तुम्ही ?''

आई म्हणाली, ''नेऊ देत नेल्या तर. खाण्याचीच वस्तू ती. झाडांना त्या शेंगा फक्त आमच्यासाठीच नाही लागल्या. झाडाला शेंगा असेपर्यंत लोकांचं लक्ष झाडाकडे जाणारच.''

हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर रंगीबेरंगी पक्ष्यांचा अखंड मेळा भरत होता. आमचा शेवगा म्हणजे माझ्यासाठी निसर्गाचा अनमोल ठेवा.

या शेवग्यामुळेच मला विविध पक्ष्यांची अगदी जवळून ओळख झाली. त्या पक्ष्यांचे विविध आकार; देखणे, मोहक रंग; लयदार लकबी, गोड आवाज, त्यांच्या मजेदार हालचाली, त्यांची दिनचर्या इत्यादी कळली.

आमच्या शेवग्याच्या पांढऱ्याशुभ्र फुलांच्या घोसांवर रुंजी घालत गुंजारव करणाऱ्या जांभळट-काळ्या टपोऱ्या भुंग्याची व माझी भेट झाली. फुलांमधला मध पिऊन फुलांभोवती नाचणाऱ्या मधमाश्या मी पाहिल्या शेवग्यामुळे. अलगत हवेत तरंगत इवल्या इवल्या चपळ फुलचुख्यांची झुंबड मला दिसली. मधानं गच्च भरलेल्या फुलांतून हवेत अलगत मध चोखण्याची कला पाहावी ती फुलचुख्यांची. इटुकला बोटभर फुलचुख्या असतो मात्र कसरतपटू. एरवी मला कधीच दिसला नसता, फक्त आवाजच ऐकून होते, तो तांबट पक्षी मनमुरादपणे मान खाली-वर करत, अगदी एकाग्रतेनं तुक्तुक् आवाजाचा टणत्कार करताना मला चक्क दिसला. भर उन्हात शेवग्याच्या उंच उंच फांदीच्या शेंड्यावर कोकीळ पक्षीही शांतपणे झुलताना मी पाहिला. छोटे छोटे हिरव्या राघूंचे थवेच्या थवे अलगत उडत उडत, हवेत तरंगत कधी किडे तर कधी परागकेशरांचा फन्ना उडवताना पाहिलं.

राघू हवेत तरंगत शिकार करण्यात अगदीच पटाईत. सर्व ऋतूंमध्ये विविध पशु-पक्षी, कीटक-किड्यांचं 'आमचा शेवगा' हे माहेर बनलं होतं. वाळलेल्या शेंगांच्या बियांच्या मेजवानीसाठी पोपटांची नियमित हजेरी लागे. पोपटांचा हिरवागार रंग, लांबसडक शेपूट अन् नखरेबाज हालचाल मी अगदी जवळून पाहिली. बुलबुल पक्ष्याच्या सुरेल ताना मी आमच्या शेवग्यामुळेच ऐकू शकले. चिमण्यांची अखंड चिवचिव अन् साळुंक्यांची एकसारखी किलकिल, अगदी कान किट्ट करणारी, मी जवळून ऐकली. हिवाळ्यात तर खंड्या नियमित हजेरी लावू लागला. एरवी मी खंड्याला चित्रातच पाहिलं होतं. खंड्याचा तो देखणा मोरपंखी निळा रंग अन् रूप, बाकदार मोठी चोच, त्याची एकाग्रता अन् किलकिल आवाज करत सुळकी मारण्याची कला मला दाखवली, ती शेवग्यानं.

वेगवेगळ्या ऋतूंमध्ये वेगवेगळी रूपं घेत आमचा शेवगा उभा आहे. माझा तो आवडता मित्र आहे. मी त्याची खूप निगा राखते. तो अजबखाना आहे. त्यानं मला किती किती सुंदर पक्षी, किडे, कीटकांची ओळख करून दिली. त्यानं माझं मनोरंजन तर केलंच, पण ज्ञानही दिलं, आनंदही दिला. शेवग्याची पानं मला खूप खूप आवडतात. किती सुरेख, झिरमिर हिरवीगार पानं. शेवग्याचा फुलोरा, पांढराशुभ्र रंग हा पक्ष्यांप्रमाणे माणसांचंही मन मोहित करतो. आपल्या हिरव्या रंगानं तो माझं मन प्रसन्न करतो. रोज नवीन उत्साह माझ्यात निर्माण करतो. त्याच्या अंगाखांद्यावर पक्ष्यांचा उत्साह बहरलेला असतो. हा पठ्ठा शेवगा आनंदानं झुलत डुलत त्यांना साद घालत असतो आणि या आनंद उत्सवात मीही सहभागी होते अन् नाचू लागते. गाऊ लागते.

**- लीला शिंदे**



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शब्दार्थ : फुलोरा –** फुलांचा बहर. **रुंजी घालणे –** भोवती फिरणे. **मनमुरादपणे –** मनसोक्तपणे. **फन्ना उडवणे –** खाऊन टाकणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शेवग्याच्या झाडावर कोणत्या रंगाच्या फुलांचे घोस लोंबत होते?
(आ) हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर कोणाचा मेळा भरत असे?
(इ) पशुपक्षी, कीटक-किड्यांचे माहेर कोणते?

**प्र. २. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) झाडे आपल्याला काय काय देतात?
(आ) शेवग्यामुळे लेखिकेला पक्ष्यांच्या कोणकोणत्या गोष्टींची ओळख झाली?
(इ) लेखिकेला शेवग्याने काय काय दिले?

**प्र. ३. कोण, कोणास म्हणाले ?**

(अ) ''दारात कधीही शेवगा लावू नये. घरात भांडणं होतात. हे झाड तुम्ही तोडून टाका.''
(आ) ''मी हे झाड लावलं ते जोपासण्यासाठी, तोडण्यासाठी नाही.''
(इ) ''अहो, लोक शेंगा तोडून नेतील, तेव्हा नाही का भांडणार तुम्ही ?''

**प्र. ४. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर .............. पक्ष्यांचा अखंड मेळा भरत होता.
(आ) अलगत हवेत तरंगत इवल्या इवल्या चपळ .............. झुंबड मला दिसली.
(इ) वेगवेगळ्या ऋतूंमध्ये वेगवेगळी रूपं घेत आमचा .............. उभा आहे.

**प्र. ५. शेवग्याच्या झाडावर येणाऱ्या विविध पक्ष्यांची नावे पाठात आली आहेत. त्यांची यादी करा.**

**प्र. ६. 'कार' प्रत्यय जोडून नवीन शब्द बनवा.**

**उदा.,** गीत - गीतकार.

(अ) संगीत (आ) चित्र (इ) नाटक (ई) कला

**प्र. ७. खालील शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) परोपकार करणे. (आ) आधार देणे. (इ) फन्ना उडवणे. (ई) रुंजी घालणे.
(उ) सुळकी मारणे.

**प्र. ८. शेवग्याच्या शेंगांपासून कोणकोणते पदार्थ बनवतात ? त्यांतल्या कोणत्याही एका पदार्थाची कृती आई-बाबांना विचारून लिहा. उदा.,** शेवग्याचं पिठलं.

**उपक्रम :** तुमच्या जवळच्या एखाद्या झाडावर कोणकोणते पक्षी जमतात, त्यांचे निरीक्षण करा. त्यांची माहिती मिळवा. वर्गात सांगा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १६. झुळूक मी व्हावे

- **ऐका. म्हणा. वाचा.**



वाटते सानुली मंद झुळुक मी व्हावे,
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे.

कधि बाजारी तर कधी नदीच्या काठी,
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी.
हळु थबकत जावे कधि कानोसा घेत,
कधि रमत गमत वा कधी भरारी थेट.



लावून अंगुली कलिकेला हळुवार,
ती फुलुनि बघे तो व्हावे पार पसार.
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा,
तो दिशादिशांतुनि फिरता उधळुनि द्यावा.

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर,
झुळझूळ झऱ्याची पसरावी चौफेर.
शेतांत पाचुच्या, निळ्या नदीवर शांत,
खुलवीत मखमली तरंग जावे गात.

**– दा. अ. कारे**





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शब्दार्थ :** **सानुली** – लहानशी. **स्वैर** – मोकळेपणा. **राईत** – दाट झाडीत, बागेत. **कानोसा घेणे** – कान देऊन लक्षपूर्वक ऐकणे. **अंगुली** – बोट. **पसार होणे** – निघून जाणे. **संगे** – बरोबर. **लकेर** – गाण्याची तान.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवीला काय व्हावेसे वाटते ?
(आ) कळीला कसे बोट लावावे, असे कवीला वाटते ?
(इ) दिशादिशांतून कवी काय उधळून देतो ?
(ई) कवीने शेताला कशाची उपमा दिली आहे ?
(उ) तुम्हांला काय व्हावेसे वाटते ?

**प्र. २. खालील अर्थाला अनुरूप कवितेतील ओळी लिहा.**

(अ) जिकडे मन आकर्षले जाईल, तिकडे अगदी मोकळेपणाने जावे.
(आ) जाता जाता सुगंध उधळत जावे.
(इ) झऱ्याचे झुळझुळ गाणे सर्वत्र पसरावे.
(ई) हिरव्यागार शेतात किंवा निळ्याशार नदीच्या काठावर जावे.

**प्र. ३. कंसातील योग्य शब्द वापरून वाक्ये लिहा.**

(पसार झाले, झुकली, कानोसा घेतला, भरारी घेतली)
(अ) घरात कोणी आहे का याचा मी ...........
(आ) मांजरीला पाहून उंदीर .............
(इ) नदीतल्या पाण्यावर झाडाची फांदी ............
(ई) पक्ष्याने आकाशात ............

**प्र. ४. रिकाम्या जागी तुमच्या मनाने शब्द भरून कविता पूर्ण करा.**

वाटते मला ............... ............... मी व्हावे.
घेईल ओढ मन ............... ............... झुकावे.
कधी ............... तर कधी ............... काठी
............ कधी वा ............ ........... पाठी.

**उपक्रम :** खालील झाडांच्या पानांचे निरीक्षण करा व वैशिष्ट्ये लिहा.
केळी, नारळ, पिंपळ, तुळस, बेल, आवळा, कडुनिंब.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १७. म्हणींच्या गमती



मे महिन्याच्या सुट्‌टीतला रविवार. दुपारची जेवणं आटपून मुलं खेळायला बाहेर पडली. मैदानावर पोचतायत तोवर चंदूची आई त्याला बोलवायला आली. ''अरे, ऊनबिन काय लागतंय का नाही? संध्याकाळचं खेळा की, आता चल घरी.'' 'येतो, येतो' म्हणून चंदू खेळत राहिला. पाठोपाठ संध्याची आई आली.

''अगं एऽऽऽ किती तापलंय बघ. वाळू पघळंल असं वाटतंय. पाचनंतर खेळा की.'' ती ओरडून गेली. मुलं पुन्हा लंगडी खेळू लागली. थोड्या वेळात हितेशचे बाबा आले. ''अरे मुलांनो, सकाळी अन् संध्याकाळी मैदानात खेळायचं. दुपारी कुणाच्यातरी घरी खेळा.'' ते सगळ्यांना म्हणाले. 'फक्त थोडा वेळ,' असं म्हणत हितेश लंगडी घालू लागला. तो चार पावलं गेला असेल, इतक्यात अमीनाचे दादू म्हणजे आजोबा बोलवायला आले. वैतागलेली अमीना म्हणाली, ''काय हो दादू ? कुणीच मोठी माणसं खेळू देईनात. घरी चल, घरी चल करतायत. अशी कशी एकसारखी वागतात ती ?'' दादू हसून म्हणाले, ''बरोबर आहे बेटा. त्यांना काळजी वाटते तुमची. कुठेही गेलात तरी **पळसाला पानं तीनच** असतात.''



शाळेत खेळांच्या स्पर्धा सुरू होत्या. बाईंनी नेहमीप्रमाणे वर्गातल्या सगळ्या मुलांना भाग घ्यायला लावला होता. धावण्याची शर्यत सुरू झाली. सुरेश सोडला तर सगळी मुलं जोरात धावत होती. उत्तम चित्र काढणारा सुरेश मैदानी खेळांबाबत आळशी म्हणून प्रसिद्ध होता. साहजिकच तो सगळ्यांत शेवटी आला. धापा टाकत तो मुलांच्या घोळक्यात शिरला आणि म्हणाला, ''अरे, खरं तर मी पहिला आलो असतो, पण आपल्या मैदानावर लाल माती आहे.'' ''म्हणजे काय ?'' राजेशने आश्चर्याने विचारले. ''अरे, मी जोरात धावलो असतो, तर माझे पांढरेशुभ्र बूट मळले असते ना, म्हणून मी हळू धावलो.'' ''व्वा ! याला म्हणतात, **नाचता येईना अंगण वाकडं**.'' घोळक्यातली राजश्री पटकन म्हणाली.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



रवी सकाळी लवकर सोपानच्या घरी आला. सोपानच्या घरातली म्हैस कालच व्याली होती, म्हणून खरवस खायला मिळेल असा रवीचा अंदाज होता. सोपान आणि त्याची चुलत भावंडं नाष्टा करत होती. प्रत्येकाच्या वाटीतला खरवस पाहून रवीच्या तोंडाला पाणी सुटलं. सोपानची काकू त्याला म्हणाली, ''रवी, चल रे. तूपण कर न्याहारी.'' ''नको काकू. मी खूऽऽप खाल्लंय.'' ''अरे, पण गूळ घातलेला खरवस तर घेशील की नाही ?'' ''नको. माझे दात दुखतायत.'' रवी म्हणाला. ''खरवसाला कशाला लागतात रे दात ? मला माहितीय तुला खरवस किती आवडतो ते. सोपान कालच म्हणाला होता, की तू येणार आहेस म्हणून. उगाच **ताकाला जाऊन भांडं लपवू नये**. चल, हात धुऊन ये.'' काकू हसत म्हणाली.

- वरील प्रसंगांमधील रंगीत शब्दसूमह नीट वाचा. उदा., **पळसाला पानं तीनच** म्हणजे कुठेही जा, परिस्थिती सारखीच आहे. सगळ्या मुलांना त्यांच्या घरचे लोक उन्हात खेळायला मनाई करतात, म्हणून **पळसाला पानं तीनच** असे म्हटले आहे.
  आपल्या भाषेमध्ये असे अनेक शब्दसमूह वापरले जातात. त्यांना **म्हणी** असे म्हणतात.
  आता उरलेले दोन्ही प्रसंग वाचून अधोरेखित म्हणींचा अर्थ शोधा. शिक्षकांशी, पालकांशी, मित्र-मैत्रिणींशी चर्चा करून आणखी म्हणी जमवा.

- **खालील चौकटींत लपलेल्या म्हणी शिक्षकांच्या मदतीने शोधा व त्यांचा अर्थ समजून घ्या.**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ए | स | ल | हा | न | तों | डी | मो | ठा | घा | स |
| मं | क | ग | हा | त | च्या | का | क | णा | ला | आ |
| ग | श | ना | वों | अ | ति | ति | थे | मा | ती | र |
| ळ | वा | र | ध | चे | पा | णी | सु | दि | व्या | सा |
| खा | ई | त्या | ला | ड | घ | प्या | ण | व | खा | क |
| प | र | म | ख | नि | भा | र | हे | ड | ली | शा |
| आ | प | लं | व | र | वा | रा | खा | ई | अं | ला |
| मां | ज | र | ख | ण | ठे | र | भ | ली | धा | ले |
| बि | न | बु | वे | आ | वा | का | अ | र | र | झा |
| श | हा | ण्या | ला | श | ब्दा | चा | मा | र | चिं | कू |
| घ | रो | घ | री | मा | ती | च्या | चु | ली | च | ध्या |



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

- प्राण्यांची चित्रे पाहा. योग्य प्राण्याचे नाव गाळलेल्या जागी लिहून म्हणी पूर्ण करा.









- आयत्या बिळात............
- वासरात लंगडी .......... शहाणी.
- ............ हाती कोलीत.
- पाण्यात राहून ............ वैर करू नये.
- ............ धाव कुंपणापर्यंत.
- ............ गेला नि झोपा केला.
- ............ मैदान जवळ आहे.
- ............ शेपूट नळीत घातले, तरी वाकडे ते वाकडेच.
- ............ गुळाची चव काय.















Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आम्ही कथा लिहितो – २








**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना प्रत्येक चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते क्रमाक्रमाने विचारावे. सर्व चित्रांच्या मदतीने गोष्ट सांगण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com







* चित्रे पाहा. कोणती घटना घडली असेल, याची कल्पना करून ती गोष्ट वर्गात सांगा. सगळ्यांत शेवटी काय झाले असेल त्याचे चित्र वहीत काढा. गोष्टीला नाव द्या.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आम्ही लेखन करतो

- वाचा. समजून घ्या. उतारा पाहून अचूक लिहा. (विरामचिन्हांसह)

राणी आजीला म्हणाली, ''बघ ना आजी, आपला सोनू मला चिडवतो.'' ''अरे सोनू इकडे ये.'' आजी म्हणाली. सोनू आजीकडे आला. ''काय गं आजी ?'' सोनू म्हणाला. ''अरे तुम्ही दोघं बहीणभाऊ. मग आपल्या ताईला का चिडवतोस ?'' आजी म्हणाली. 'अस्सं आहे होय !' सोनू मनाशीच म्हणाला. ''अगं आजी आम्ही दोघं खेळतो एक तासभर. तू बघ कोण काय करतं ते. मग बोल मला. म्हणतात ना, हातच्या काकणाला आरसा कशाला ?'' सोनू म्हणाला.

- वाचा. समजून घ्या. कंसातील विरामचिन्हे योग्य ठिकाणी वापरून उतारा पुन्हा लिहा.

( , . ! ? '' '' )

गांधीजींचे मित्र एकदा त्यांना भेटायला आले दोघांनी गप्पागोष्टी केल्या गांधीजींचे लक्ष मित्राच्या धोतराकडे गेले ते मित्राला म्हणाले अरे इतका श्रीमंत झालास पण तुझे धोतर फाटकेच मित्र म्हणाला अरे भाई श्रीमंतालाही काही अडचणी असतात गांधीजी म्हणाले फाटके धोतर नेसण्याइतकी काय अडचण आली मित्र म्हणाला नोकर काम करत नाहीत हे ऐकून गांधीजींनी लगेच त्याचे धोतर शिवून दिले हे पाहून तो श्रीमंत गृहस्थ गांधीजींना काय सांगायचे आहे ते समजून गेला.

**शिक्षकांसाठी :** हा उतारा श्रुतलेखनासाठी वापरावा. उतारा वाचून यात योग्य ठिकाणी योग्य विरामचिन्हे घालून विद्यार्थ्यांना लिहिण्यास सांगावा. हा उतारा विरामचिन्हांसह फलकावर लिहावा. तो पाहून विद्यार्थ्यांना त्यांचे लेखन तपासण्यास सांगावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १८. जननायक बिरसा मुंडा



बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी सुगाना व करमी या आदिवासी दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे जन्मगाव उलिहातू हे रांचीजवळ आहे.

बिरसाचे आई-वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. गावात शाळा नसल्याने त्यांना मामाकडे शिक्षणासाठी पाठवले. तेथे मिशनरी शाळेमध्ये त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. शिक्षणाबरोबरच बिरसा यांना संगीत व नृत्यातही विशेष रस होता.

तो काळ पारतंत्र्याचा होता. संपूर्ण देशाला इंग्रजांनी गुलाम बनवून ठेवले होते. जंगलात राहणारे आदिवासीही या गुलामगिरीतून वाचले नव्हते. इंग्रजांनी वन-कायदा करून आदिवासींचा जंगलावरचा पारंपरिक अधिकार नाकारला होता. त्यामुळे आदिवासींमध्ये इंग्रजांच्या विरुद्ध असंतोष निर्माण झाला होता.

१८९४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. उपासमार व रोगराईत अनेक लोक मरण पावले. तशातच ब्रिटिशांनी जमीनदार व जहागीरदारांकरवी शेतकऱ्यांवर अवाजवी शेतसारा लावला होता. याविरुद्ध बिरसाने वेळोवेळी जनआंदोलन केले. यामुळे संतप्त होऊन इंग्रज सरकारने १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. त्यांना हजारीबाग तुरुंगात डांबण्यात आले. याच तुरुंगात बिरसांनी इंग्रजी सत्ता मुळासकट उखडून टाकण्याचा संकल्प केला आणि आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्ध उलगुलान पुकारला. 'उलगुलान' म्हणजे एकाचवेळी सर्वांगीण उठाव.

१८९७ नंतर बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी आपल्या पारंपरिक शस्त्रांद्वारे अनेक लढाया केल्या. ब्रिटिशांना जेरीस आणले; परंतु ब्रिटिशांच्या आधुनिक शस्त्रांपुढे व मोठ्या सैन्यबळापुढे आदिवासी क्रांतिकारकांचा टिकाव लागू शकला नाही.

१८९८ मध्ये एका नदीकाठी झालेल्या लढाईत सुमारे ४०० आदिवासी क्रांतिकारक शहीद झाले.

आपल्या २५ वर्षांच्या आयुष्यात बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या शोषणाचे मूळ परकीय राजकीय व्यवस्थेत आहे हे ओळखले. त्याविरुद्ध आदिवासी समाजाला संघटित केले. ब्रिटिश सत्तेविरुद्ध वेळोवेळी लढे पुकारले. त्याचबरोबर आदिवासींचे आर्थिक शोषण करणाऱ्या जमीनदार व जहागीरदार यांच्या विरोधातही बंड पुकारले. त्यामुळेच आजही आदिवासी समाज बिरसा मुंडा यांना आपला नेता मानतो. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सन १९०० मध्ये बिरसा मुंडा पहाडांमध्ये आदिवासी जनतेस मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने अचानक हल्ला चढवला. त्या ठिकाणी भीषण लढाई झाली. बिरसा मुंडांना चक्रधरपूर येथे बंदी बनवून रांची येथील कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. तुरुंगात त्यांच्यावर अनन्वित अत्याचार करण्यात आले. त्यामुळे ९ जून १९०० रोजी त्यांना तुरुंगातच वीरगती प्राप्त झाली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात बिरसा मुंडा हे नाव अमर झाले.

या वीराने आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी मोठा लढा दिला. त्यामुळे लोकांनी त्यांना 'जननायक' हा किताब बहाल केला.

शब्दार्थ : **शेतसारा** – शेतजमिनीवरील कर. **जनआंदोलन** – लोकांनी केलेले आंदोलन. **सक्तमजुरी** – अतिशय कष्टाचे काम. **किताब** – पदवी.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) बिरसा मुंडा यांचा जन्म केव्हा व कोठे झाला ?
(आ) बिरसा मुंडा यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कोणत्या शाळेत झाले ?
(इ) बिरसा मुंडा यांना कोणकोणत्या गोष्टींत विशेष रस होता ?
(ई) तुरुंगात असताना बिरसा मुंडा यांनी कोणता संकल्प केला ?
(उ) बिरसा मुंडा यांना लोकांनी कोणता किताब बहाल केला ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) संपूर्ण देशाला ............... गुलाम बनवून ठेवले होते.
(आ) १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना ............ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.
(इ) बिरसा मुंडा यांना ................... तुरुंगात डांबण्यात आले.

**प्र. ३. वाक्प्रचार व त्यांचा अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) रस असणे. | (अ) तुरुंगवासाला पाठवणे. |
| (२) असंतोष निर्माण होणे. | (आ) एखादी गोष्ट करण्याचा निश्चय करणे. |
| (३) कारावास ठोठावणे. | (इ) टिकणे. |
| (४) संकल्प करणे. | (ई) देशासाठी लढताना मरण येणे. |
| (५) टिकाव लागणे. | (उ) रुची असणे, आवड असणे. |
| (६) वीरगती प्राप्त होणे. | (ऊ) चीड निर्माण होणे. |

**प्र. ४. 'जननायक' हा किताब जसा बिरसा मुंडा यांना मिळाला, तसे खालील किताब कोणाला मिळाले ?**

(अ) महात्मा (आ) लोकमान्य (इ) स्वातंत्र्यवीर (ई) नेताजी (उ) क्रांतिसिंह (ऊ) लोकनायक

**प्र. ५. पाठात आलेल्या सनांची व घटनांची यादी करा.**

उदा., १५ नोव्हेंबर १८७५ – बिरसा मुंडा यांचा जन्म.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १९. हें कोण गे आई ?

• ऐका. म्हणा. वाचा.

नदीच्या शेजारीं । गडाच्या खिंडारीं
झाडांच्या ओळींत । वेळूंच्या जाळींत
दिवसा दुपारीं । जांभळी अंधारी
मोडकें देऊळ । त्यावरी पिंपळ
कोण गे त्या ठायीं । राहतें गे आई ? ।।१।।





चिंचांच्या शेंड्यांना । वडांच्या दाढ्यांना
ओढोनी हालवी । कोण गे पालवी ?
कोण गे जोरानें । मोठ्यानें मोठ्यानें
शीळ गे वाजवी ? पांखरां लाजवी ?
सारखी किति वेळ । ऐकूं ये ती शीळ ? ।।२।।

वाळलीं सोनेरी । पानें गे चौफेरीं
मंडळ धरोनी । नाचती ऐकोनी !
किती मीं पाहीलें । इतकेंची देखीलें —
झाडांच्या साउल्या । नदींत कांपल्या !
हांका मीं मारिल्या । वांकोल्या ऐकिल्या ।।३।।

उरांत धडधडे । धांवतां मी पडें
पळालों तेथून । कोण ये मागून ? ।।४।।

– भा. रा. तांबे



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शब्दार्थ :** **गडाचे खिंडार** – किल्ल्याचा अरुंद रस्ता **ठायी** – ठिकाणी. **वडाची दाढी** – वडाची पारंबी. **ओढोनी** – ओढून. **पांखरां** – पाखरांना, पक्ष्यांना. **चौफेरी** – सगळीकडे. **मंडळ** – गोलाकार. **इतकें** – एवढे. **देखीलें** – पाहिले. **साउल्या**– सावल्या. **कापणे** – हालणे, कंप पावणे, थरथरणे. **वांकोल्या ऐकिल्या** – प्रतिध्वनी ऐकला. **उरांत** – हृदयात.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पाखरांसारखी शीळ कोण वाजवत आहे ?
(आ) कवी घाबरून का पळाला ?
(इ) कवितेत घडलेल्या सर्व घटना कोणामुळे घडल्या ?
(ई) कवीने वाकुल्या केव्हा ऐकल्या ?

**प्र. २. खालील गोष्टींसाठी कवीने कोणते शब्द वापरले आहेत ?**

(अ) वडाच्या पारंब्या.
(आ) दाट झाडांतून–पानांतून वारा वेगाने वाहतो तेव्हा येणारा आवाज.
(इ) वावटळ.

**प्र. ३. तुम्ही कधी एखाद्या गोष्टीला घाबरला होतात का ? त्या वेळी तुम्हांला काय अनुभव आला ?**

### बदलती भाषा

ही कविता फार पूर्वीची आहे. त्या काळी अनेक शब्द वेगळ्या पद्‌धतीने लिहिले, बोलले जात असत. आता आपण ते निराळ्या पद्‌धतीने लिहितो. खालील तक्ता पाहा. शब्द उच्चारण्याच्या नव्हे, तर लिहिण्याच्या पद्‌धतीदेखील वेळोवेळी बदलतात.


| | | | |
|---|---|---|---|
| ओळींत – ओळीत | जाळींत – जाळीत | दुपारीं – दुपारी | मोडकें – मोडके |
| ठायीं – ठायी | राहतें – राहते | जोरानें–जोराने | मोठ्यानें – मोठ्याने |
| पांखरां – पाखरा | ऐकूं – ऐकू | वाळलीं – वाळली | पानें – पाने |
| चौफेरीं – चौफेरी | मीं – मी | पाहीलें – पाहिले | इतकेंची – इतकेची |
| देखीलें – देखीले | नदींत – नदीत | कांपल्या – कापल्या | हांका – हाका |
| उरांत – उरात | धांवतां – धावता | पडें – पडे | पळालों – पळालो |
| किति – किती | शेजारीं – शेजारी | खिंडारीं – खिंडारी | वांकोल्या – वाकुल्या |



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आम्ही सूचना फलक वाचतो




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात काय काय दिसते ते विचारावे. किल्ल्याचे वर्णन करायला सांगावे. किल्ल्याजवळच्या सूचना फलकावरील मजकूर वाचून घ्यावा. त्यावर चर्चा करावी. आपल्या शाळेसाठी असा सूचना फलक तयार करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# २०. कोलाज



## सचिन रमेश तेंडुलकर




**जन्मदिनांक :** २४ एप्रिल १९७३

**पहिला कसोटी सामना :** १५ नोव्हेंबर १९८९
**पहिला एक दिवसीय सामना :** १८ डिसेंबर १९८९

एक दिवसीय शतके : ४९

एक दिवसीय सामन्यांतील अर्धशतके : ९६




कसोटी शतके : ५१

एक दिवसीय सामन्यांतील धावा : १८,४२६

कसोटीमधील धावा : १५,९२१

**शेवटचा कसोटी सामना :** १४ नोव्हेंबर २०१३
**शेवटचा एक दिवसीय सामना :** १८ मार्च २०१२





सचिन तेंडुलकरला भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान देण्यात आला. सर्वांत कमी वयात 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित.

### जागतिक विक्रम

- पुरुषांच्या एक दिवसीय स्पर्धेत द्विशतक करणारा पहिला खेळाडू.
- कसोटी आणि एक दिवसीय क्रिकेट सामने सर्वोच्च संख्येने खेळणारा खेळाडू.
- आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतकांचे शतक करणारा एकमेव खेळाडू.
- कसोटी क्रिकेटमध्ये ५० पेक्षा जास्त शतके करणारा एकमेव खेळाडू.
- कसोटी क्रिकेटमध्ये १५ हजार धावा करणारा पहिला फलंदाज.
- जागतिक विक्रमांमध्येही जागतिक विक्रम करणारा खेळाडू.

### काही सन्मान

- अर्जुन पुरस्कार
- राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार
- पद्मश्री
- महाराष्ट्र भूषण
- पद्मविभूषण
- भारतरत्न

सचिनचे खूप कौतुक वाटणाऱ्या एका छोट्या मुलीने त्याच्या क्रिकेटमधील विक्रमांची व इतर माहिती जमवून हा 'कोलाज' बनवला आहे. तुम्हीदेखील तुमच्या आवडत्या व्यक्तीचा किंवा खेळाडूचा असा कोलाज तयार करा.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


# माझा आवडता क्रिकेटपटू





**निरोप समारंभातील भाषण**

क्रिकेटमधून निवृत्त होतानाच्या भाषणात सचिनने त्याला मदत करणाऱ्या सर्वांचे म्हणजे – त्याचे आई-बाबा, कुटुंबीय, नातेवाईक, मित्र, गुरू, डॉक्टर, प्रशिक्षक, व्यवस्थापक, प्रसारमाध्यमे – या सगळ्यांचे आभार मानले.



आमचा लाडका सचिन !



१९९९ च्या विश्वचषक स्पर्धेतील सामने सुरू असताना सचिनचे वडील प्रा. रमेश तेंडुलकर यांचे निधन झाले. सचिन थोड्याच काळासाठी इंग्लंडहून भारतात आला आणि लगेचच स्पर्धेसाठी परत गेला. केनियाविरुद्धच्या पुढील सामन्यात त्याने नाबाद शतक केले. (१०१ चेंडूंत १४० धावा.) हे शतक त्याने आपल्या वडिलांना अर्पण केले.

रमाकांत आचरेकर सरांविषयी सचिन काय म्हणाला –

"गेल्या २९ वर्षांमध्ये सर मला कधीही 'छान खेळलास' असे म्हणालेले नाहीत, कारण मी बेसावध होईन आणि मेहनत करायचे थांबवेन, असे त्यांना वाटायचे. आता माझ्या कारकिर्दीबद्दल ते कदाचित म्हणतील, 'उत्तम', कारण यापुढील आयुष्यात मी सामने खेळणार नाही. मी क्रिकेट पाहत राहीन आणि क्रिकेट कायम माझ्या हृदयात असेल. सर, माझ्या आयुष्यातील तुमचे योगदान फार मोठे आहे आणि त्यासाठी धन्यवाद !"





वर्तमानपत्रे, मासिके यांतील कात्रणे, चित्रे, फोटो, घोषणा, माहिती, उतारे, कविता या सगळ्यांची कलात्मक मांडणी करून कोलाज बनवला जातो. एका कोलाजमध्ये एक विषय मांडला जातो किंवा अनेक विषय एकत्रितपणे मांडले जातात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## 'भारतरत्न'



'भारतरत्न' सन्मान पदकाच्या दोन्ही बाजू

'भारतरत्न' हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान आहे. हा सन्मान राष्ट्रीय सेवेसाठी दिला जातो. या राष्ट्रीय सेवांमध्ये कला, साहित्य, विज्ञान, सार्वजनिक सेवा आणि क्रीडा यांचा समावेश आहे. या सन्मानाचा प्रारंभ २ जानेवारी १९५४ रोजी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या काळात केला गेला.

सुरुवातीला हा सर्वोच्च नागरी सन्मान मरणोत्तर देण्याची प्रथा नव्हती. इ. स. १९५५ मध्ये हा नागरी सन्मान मरणोत्तरसुद्धा देण्याची तरतूद करण्यात आली. हा नागरी सन्मान एका वर्षात जास्तीत जास्त तीन व्यक्तींना देण्यात येतो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना इ. स. १९५४ साली पहिला भारतरत्न सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरवण्यात आले.

### *'भारतरत्न' सन्मानप्राप्त काही सन्माननीय व्यक्ती*

| क्र. | नाव | सन |
|---|---|---|
| १. | डॉ. धोंडो केशव (महर्षी अण्णासाहेब) कर्वे | १९५८ |
| २. | डॉ. पांडुरंग वामन काणे | १९६३ |
| ३. | आचार्य विनोबा (विनायक नरहर) भावे | १९८३ (मरणोत्तर) |
| ४. | डॉ. बाबासाहेब (भीमराव रामजी) आंबेडकर | १९९० (मरणोत्तर) |
| ५. | लता दीनानाथ मंगेशकर | २००१ |
| ६. | पंडित भीमसेन जोशी | २००८ |
| ७. | सचिन रमेश तेंडुलकर | २०१३ |






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# २१. आभाळमाया

- ऐका. म्हणा. वाचा.



पावसा रे, पावसा रे,
मला पावसाचे ढग बनू दे.
डोंगर, दरी आणि शेतात,
मला खूप कोसळू दे.



शेतकरीबाबा, शेतकरीबाबा
मला बी म्हणून पेरून दे,
शेत खूप पिकून पिकून,
तुम्हांला बरकत होऊ दे.



पणती गं, पणती गं,
मला दिवा होऊन जळू दे.
गरिबांच्या झोपडीत,
उजेड मला नेऊ दे.



पक्ष्या रे, पक्ष्या रे,
मला चोच आणि पंख फुटू दे.
तोंडात फळे घेऊन जाऊन,
भुकेकंगालांना वाटू दे.



परी गं, परी गं,
मला बागेत येऊ दे.
आनंदाने नाचगाण्यासाठी,
साऱ्यांना आभाळमाया मिळू दे.

– विलास सिंदगीकर





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शब्दार्थ :** **कोसळणे** – जोरात पडणे. **भुकेकंगाल** – भुकेलेले आणि पैसा नसलेले.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पावसाचे ढग होऊन कोठे कोसळावे असे कवीला वाटते ?

(आ) शेतकऱ्याला बरकत केव्हा येते ?

(इ) कवीला उजेड कोठे न्यायचा आहे ?

(ई) पक्ष्याकडे पाहून कवीला काय वाटते ?

(उ) आभाळमाया मिळावी, असे कवी का म्हणतो ?

**प्र. २. कवीला खालील गोष्टी पाहून काय व्हावेसे वाटते ?**

(अ) पाऊस (आ) पणती

**प्र. ३. खालील गोष्टींचा वापर कशासाठी होतो ते सांगा.**

(अ) अंगण (ई) फुले

(आ) मैदान (उ) दिवा

(इ) शेत

**प्र. ४. तुम्ही कोणासाठी काय द्याल ?**

(अ) मित्रांसाठी (आ) शाळेसाठी (इ) घरासाठी

(ई) शेतासाठी (उ) आईसाठी (ऊ) बाबांसाठी

**प्र. ५. तुम्ही पक्षी झाला आहात, अशी कल्पना करून पाच–सहा ओळी लिहा.**








Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आम्ही चित्रवर्णन करतो




- **या चित्राचे आठ ते दहा ओळींत वर्णन लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. विद्यार्थ्यांना चित्रातील न कळलेल्या बाबींची माहिती सांगावी. चित्राचे तोंडी किंवा लेखी वर्णन करण्यास सांगावे. रेल्वे/बस प्रवासाचा स्वत:चा एखादा अनुभव कथन करण्यास सांगावे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# २२. होय, मीसुद्‌धा !

'मोऽऽऽहन', अशी आईची हाक ऐकताच मोहन समजला, 'आईचं काहीतरी काम आहे.' आई कुठल्या वेळी कशी हाक मारते, हे मोहनला पक्के ठाऊक होते.

कपाळावर आठ्या घालतच मोहन घरात आला. त्याला खेळायला जायचे होते. मोहनला पाहताच आई म्हणाली, ''अरे राजा, एक छोटंसं काम करशील का रे ?'' मोहनने चेहरा कसनुसा केला.

''अरे, जरा मला दुकानातून डाळ, तांदूळ आणि साखर आणून दे ना रे पटकन.''

मोहनने आईकडून पैसे व पिशवी घेतली आणि दुकानाकडे निघाला. दुकानदाराकडून साखर, डाळ आणि तांदूळ घेतले. दुकानदाराला पैसे दिले. दुकानदाराने परत दिलेले पैसे त्याने खिशात कोंबले. धावतच घर गाठले.

मोहनने घरात पिशवी ठेवली. आईला पैशांचा हिशेब देण्यासाठी मोहनने आकडेमोड केली. कागदावर हिशेब मांडला. खिशातले पैसे काढून भराभरा मोजू लागला.

दुकानदाराने चुकून पन्नास रुपये मोहनला जास्त दिले होते.

त्याने हळूच पाहिले. आईचे लक्ष नव्हते. आई कामात होती. मोहनने थरथरत्या हाताने 'ती पन्नासची नोट' पँटच्या खिशात ठेवली.

त्याने आईला हिशेब दिला. उरलेले पैसे मोजून दिले. आई काही म्हणणार, तोच आईची नजर चुकवत मोहन म्हणाला, ''आई मी खेळायला जातो.''

मोहनचे मित्र खेळ खेळण्यासाठी वाटच पाहत होते. सर्वजण खेळात रमले, पण त्याचे मन खेळात रमेना. मोहन घरी परतला. आई मोहनची वाटच पाहत होती.

''चल, हातपाय धुऊन ये. जेवायला बसूया.'' मोहनने वरणभात कालवला. एक घास घेतला. एवढ्यात आई म्हणाली, ''अरे, तू सकाळी आणलेल्या तांदळाचा हा भात आहे ! काय कसा आहे तांदूळ ?''

मोहन अस्वस्थ झाला. त्याच्या पोटात खड्डा पडला. त्याला घास गिळता येईना. घास तोंडात फिरू लागला. त्याने बळेबळे घास गिळला, वर घटाघटा पाणी प्यायला.

''अरे, मघाशी दुकानातला माणूस येऊन गेला घरी.'' आई म्हणाली. त्याला आईचे पुढचे बोलणे ऐकूच आले नाही. भीतीने त्याचे पाय लटलटू लागले. पोटात बाकबूक होऊ लागले. त्याला 'ती खिशातील नोट' टोचू लागली.

आई पुढे म्हणाली, ''तो माणूस म्हणाला, की 'सकाळी दुकानात खूप गर्दी होती. त्या गर्दीत थोडा घोटाळा झाला. थोडी गडबड झाली. मग त्याच्या लक्षात आलं, त्यानं तुला चुकून...''



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



मोहनला पुढे ऐकणे असह्य झाले. त्याला वाटले, आपण कबूल करावे. आईला सांगावे, आपण पन्नास रुपये घेतले. त्याने डावा हात खिशात घट्ट धरला आणि झटक्यात उजवा हात वर केला, पण मोहन काही बोलू शकला नाही.

आईने त्याला वरण वाढले आणि म्हणाली, ''अरे, त्या सकाळच्या गडबडीत त्यानं तुला तांदूळ दिलेच नाहीत. थोड्या वेळानं मी पुड्या उघडल्या तर दोन पुड्यांत डाळी आणि एका पुडीत साखर ! मी तुलाच हाक मारणार होते. इतक्यात तो आला, म्हणाला, 'अवो वैनी, त्या शांताबाईंची डाळ तुमच्याकडे, आनी तुमचे तांदूळ त्यांच्याकडे. समदा घोटाळा झाला !' अरे, म्हणून तुला मी मघाशी गमतीत म्हटलं, तू आणलेला तांदूळ कसा...''

मोहनचा जीव भांड्यात पडला. तो कसनुसा चेहरा करून हसला. बळेबळे जेवला. मोहनच्या मनात चलबिचल सुरू होती. 'ती नोट' त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. आईची नजर चुकवण्यासाठी त्याने गोष्टीचे पुस्तक वाचायला घेतले, पण त्याचे लक्ष लागेना. त्याने पुस्तक ठेवून दिले.

आई मोहनजवळ येत म्हणाली, ''आज शनिवार, आता इतक्यात बाबा येतीलच. मग आज संध्याकाळी आपण बाहेर जाऊ. तुला आणि बाबांना शर्टाचं नवीन कापड घेऊ, पण हे बाबांना सांगायचं नाही. आपण दोघं मिळून त्यांना चकित करू.''

मोहनला आवंढा गिळताना त्रास होऊ लागला. त्याच्या डोक्यावरून हात फिरवत आई म्हणाली, ''अरे, माझ्या लहानपणी आमची गरिबी होती. माझा फाटलेला फ्रॉक पाहून माझ्या मैत्रिणीच्या आईनं मला मैत्रिणीचा फ्रॉक देऊ केला होता; पण मी त्यांना ठणकावून सांगितलं – काकू, आम्ही गरीब जरूर आहोत, पण स्वाभिमानी आहोत. ज्यांची खरंच ऐपत नसेल त्यांना द्या. हे मी घरी सांगितल्यावर आईनं मला शाबासकी दिली. कोणाचं फुकट काही घेतलेलं तिला आवडत नव्हतं, बाबांनी दिवाळीला ठिगळं लावलेला शर्ट घातला, पण मला नवीन फ्रॉक आणला.''




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

मोहन ढसाढसा रडू लागला. मोहनचे डोळे पुसत आई म्हणाली, ''अरे राजा, नवीन शर्टाचा विषय निघाला, म्हणून ही जुनी गोष्ट आठवली. रडायला रे काय झालं तुला ? हे बघ, तू माझा मुलगा आहेस. माझ्यासारखाच स्वाभिमानी आणि प्रामाणिक आहेस.''

मोहनचा हात नकळत खिशावर गेला. मोहन ताडकन उठला व म्हणाला, ''आई, मी आलो गं एका मिनिटात'' आणि चपला न घालताच घराबाहेर पडला.

''अरे, आता कुठे चाललास उन्हाचा ? ती टोपी तरी घाल रे आणि आता येतीलच बाबा...''



आईचे बोलणे ऐकायला मोहन घरात नव्हताच. तो भरदुपारी रस्त्यावरून अनवाणी धावत होता. तो दुकानात गेला. दुकानदार एकटाच हिशेब करत बसला होता. मोहनने दुकानदाराला ती पन्नास रुपयांची नोट परत केली. म्हणाला, ''सॉरी ! माझी चूक झाली. सकाळी मला तुमच्याकडून जास्ती पैसे आले. मला यायला उशीर झाला.'' दुकानदार हसला. त्याने मोहनला शाबासकी दिली. समोरच्या बरणीतले एक चॉकलेट काढून त्याने मोहनसमोर धरले.

मोहनने हात जोडून पुन्हा एकदा 'सॉरी' म्हटले आणि चॉकलेट न घेताच त्याने घराकडे धूम ठोकली. धापा टाकतच मोहन घरात शिरला. त्याला नीट बोलताही येईना. त्याला खूप भरून आले होते. त्याने आईचा हात हातांत घेतला आणि म्हणाला, ''होय, मीसुद्ध्‌धा स्वाभिमानी आणि प्रामाणिक आहे तुझ्यासारखा ! होय, मीसुद्ध्‌धा !''

**– राजीव तांबे**

**शब्दार्थ : पोटात खड्डा पडणे –** खूप भीती वाटणे. **पाय लटलट कापणे –** भीतीने पाय थरथर कापणे. **अनवाणी –** पायांत चपला वगैरे न घालता.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) आईने मोहनला दुकानातून काय आणायला सांगितले ?
(आ) मोहनने आकडेमोड का केली ?
(इ) मोहनला किती रुपये जास्त आले होते ?

**प्र. २. का, ते लिहा.**

(अ) आईने मोहनला हाक मारली.
(आ) मोहन कपाळावर आठ्या घालत घरात आला.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

(इ) मोहनच्या आईला तिच्या आईने शाबासकी दिली.
(ई) दुकानदाराने मोहनला शाबासकी दिली.
(उ) मोहनला खूप भरून आले.

**प्र. ३. खालील वाक्प्रचार व त्यांच्या अर्थांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) पोटात बाकबूक होणे. | (अ) खूप रडणे. |
| (२) जीव भांड्यात पडणे. | (आ) खूप घाबरणे. |
| (३) ढसाढसा रडणे. | (इ) दिलासा मिळणे. |

**प्र. ४. खालील शब्दांना जोडून येणारे शब्द लिहा.**

(अ) आकडे.................. (इ) हात.....................
(आ) आरडा.................. (ई) कावरा...................

**प्र. ५. पाठात 'पायांत जोडे न घातलेला' – या शब्दसमूहाबद्दल 'अनवाणी' हा एक शब्द आलेला आहे. खालील शब्द वाचा. असे आणखी शब्द शोधून लिहा.**

(अ) जन्म झालेले ठिकाण – जन्मस्थान
(आ) विमान चालवणारा – वैमानिक
(इ) कविता करणारी – कवयित्री
(ई) शोध लावणारा – संशोधक
(उ) देशाची सेवा करणारा – देशसेवक

**प्र. ६. वाक्यातील रिकाम्या जागी खालील शब्दसमूहांची योग्य रूपे वापरा.**

(चेहरा कसनुसा करणे, नजर चुकवणे, अस्वस्थ होणे.)

कपबश्या कपाटात ठेवताना माझ्या हातून एक कप फुटला. त्यामुळे मी .......... झालो. मी .......... आईकडे गेलो. तिच्याशी .......... बोलू लागलो.

**प्र. ७. 'दुकान' या शब्दाला 'दार' प्रत्यय लावून 'दुकानदार' असा शब्द पाठात आलेला आहे. असे आणखी शब्द शोधून लिहा.**





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# २३. मन्हा खान्देस्नी माटी

• ऐका. म्हणा. वाचा.



मन्हा खान्देस्नी माटी
सोनानी थाटी,
जागे जागे देखा
अहिरानीनी दाटी.

मन्हा खान्देस्नी माटी
सोनानी मूस
शिवारे शिवारे
हिरवागार ऊस.

मन्हा खान्देस्नी माटी
कच्ची चांदीना तुकडा,
केयी कमयजाना
देखील्या मुखडा.

मन्हा खान्देस्नी माटी
लोनी सारखी मऊ,
पिकस सालोसाल
सायमाय-गहू.

मन्हा खान्देस्नी माटी
माटी भागवान,
सदा तिन्हा जीव्वर
नही कसानी वान.

**– शकुंतला भा. पाटील**

**शिक्षकांसाठी :** शेतकरी शेतावर काम करताना म्हणतात, अशा गाण्यांचा संग्रह विद्यार्थ्यांना करायला सांगावा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शब्दार्थ :** **मन्हा** – माझ्या. **सोनानी थाटी** – सोन्याचे ताट. **देखा** – पाहा. **माटी** – माती. **मूस** – भट्टी, साचा. **केयी** – केळी. **कमयजाना** – कमळासारखे. **मुखडा** – चेहरा, तोंड. **लोनी** – लोणी. **पिकस** – पिकते. **सालोसाल** – वर्षानुवर्षे. **भागवान** – भाग्यवान. **जीव्वर** – जिवावर. **कसानी** – कशाचीही. **वान** – उणीव.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) खानदेशी मातीचा थाट कोणासारखा आहे ?
(आ) खानदेशी शिवाराला 'सोनानी मूस' का म्हटले आहे ?
(इ) खानदेशी माती कशासारखी मऊ आहे ?
(ई) खानदेशी मातीला भाग्यवान का म्हटले आहे ?

**प्र. २. कवितेतील शेवटी सारखी अक्षरे येणारे शब्द लिहा.**

**उदा.,** माटी–थाटी.

(अ) ऊस (आ) तुकडा (इ) भागवान

**प्र. ३. 'सालोसाल' यासारखे आणखी शब्द सांगा.**

**प्र. ४. 'भाग्य' या शब्दाला 'वान' हा प्रत्यय लागून 'भाग्यवान' हा शब्द तयार झाला आहे. खालील शब्दांना 'वान' प्रत्यय लावा.**

(अ) बल (आ) धन (इ) गाडी (ई) गुण

**उपक्रम :** परिसरातील शेतांमध्ये जाऊन तेथील पिकांचे व मातीचे निरीक्षण करा. शेतकऱ्यांकडून त्याबद्दलची माहिती घेऊन वहीत लिहा.



### वाचा.

मोहन मित्राकडे खेळायला आलेला असतो. तेथे त्याला काका भेटतात.


काका : अरे, मोहन तुझे बाबा कुठे आहेत?
मोहन : काका, ते घरी आहेत.
काका : तू हे कशावरून सांगतोस?
मोहन : अहो काका, मी त्यांच्या चपला घालून आलोय.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## आमचे गाव (नकाशा)




### स्वाध्याय

**प्र. १. एका गावातील छोट्या भागाचे चित्र वर दिले आहे. ते काळजीपूर्वक अभ्यासा. रमेशच्या घराकडे पाठ केल्यानंतर सरळ पूर्वेकडे गेले, की तळे येते हे लक्षात ठेवून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. चित्रामध्ये पेन्सिलने रेघा काढून सर्व उत्तरे दाखवा.**

(अ) ग्रामपंचायत कोणाच्या घराजवळ आहे ?

(आ) रमेश सुट्टीच्या दिवशी गोपाळकडे खेळायला गेला. त्याला रस्त्यात काय काय लागले ?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात काय काय दिसते ते विचारावे. विद्यार्थ्यांना चित्रातील न कळलेल्या बाबींची माहिती सांगावी.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

(इ) जोसेफच्या घरापासून बसस्थानकापर्यंत येताना वाटेत काय काय लागेल ?

(ई) जोसेफला कोणत्या दिशेने गेल्यास जस्मिनचे घर जवळ पडेल ? वाटेत काय लागेल ?

(उ) जोसेफच्या घरापासून ग्रामपंचायतीला जाण्यासाठी कोणकोणत्या मार्गांनी जाता येईल ? दिशांसहित उत्तरे लिहा.

(ऊ) बसस्थानकावरून वाचनालयाकडे जाताना वाटेत काय काय लागेल ?

(ए) मंदारला त्याच्या घरापासून शाळेला जाण्याचा सर्वांत जवळचा मार्ग कोणता ?

**प्र. २. तुमच्या घरापासून शाळेत येण्याच्या मार्गाचे रेखाचित्र तयार करा.**

## आम्ही असेही बोलतो

ही इंडी गावातली शाळा. सय्यदबाई अन् कलबुर्गीसर तिसरी आणि चौथीला शिकवतात. या शाळेतली मुलं, शिक्षक कन्नड बोलतात. ती त्यांच्या सरांना, बाईंना काय सांगतायत ते पाहा.



ही चन्नाक्का. ती बाईंना काय विचारते ?



ही जमीला. तिने तिचे बोट कशासाठी वर केले आहे ?



हे कलबुर्गीसर. ते मुलांना काय सांगतायत ?

वरील चित्रांतील मुलं कन्नड भाषा बोलणारी आहेत. त्यांची भाषा आपल्याला येत नाही. तरीही त्यांनी केलेल्या खाणाखुणांवरून त्यांना काय म्हणायचं ते आपल्याला कळतं. ती मुलं व शिक्षक खुणांनी काय सांगत असतील ते सांगा.

तोंडातून एकही शब्द न काढता कसं बोलता येतं, कळलं ना ? असा खेळ वर्गात खेळून पाहा. खेळाचा एक नियम आहे - एक अक्षरही बोलायचं नाही, लिहायचं नाही, फक्त खाणाखुणा करायच्या. खालील वाक्ये वाचा. ही मुलं खाणाखुणा कशा प्रकारे करतील ते वर्गात दाखवा.

१. अनिलला भूक लागली आहे.

२. निशाला झोप येत आहे.

३. तुमच्या वर्गाचा संघ खो-खोमध्ये जिंकला आहे, म्हणून तुम्हांला आनंद झाला आहे.

४. मधल्या सुट्टीत बारकू वर्गातल्या मित्रमैत्रिणींना जेवायला बोलवत आहे.

६. झरीना मागच्या बाकावरच्या महेशला पुढे बोलवत आहे.

७. शिल्पाची छोटी बहीण सारखी रडते, हे ती तिच्या मैत्रिणींना सांगते आहे.

**शिक्षकांसाठी :** वरील चित्रे विद्यार्थ्यांना दाखवावी. विद्यार्थ्यांना खुणांचा अर्थ समजावून सांगावा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# २४. थोर हुतात्मे

लाहोरचा प्रचंड तुरुंग. सर्वत्र गंभीर, भयसूचक वातावरण. सशस्त्र सैनिकांचा कडेकोट बंदोबस्त. थोड्याच वेळानंतर फासावर चढवले जाणार असलेले तीन तरुण क्रांतिवीर 'इन्किलाब झिंदाबाद'च्या घोषणा देत निघाले होते. सकाळपासून बाहेर मोठा जमाव जमला होता.

साक्षात मृत्यू समोर उभा असताना क्रांतीचा जयजयकार करणारे कोण होते ते निर्भय तरुण ? ते होते भारतमातेचे थोर सुपुत्र भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव.

सन १९२८ साली लाहोर येथे 'सायमन कमिशन'च्या विरोधात जी उग्र निदर्शने झाली, त्यांत ब्रिटिश अधिकारी स्कॉटच्या आदेशावरून पोलिसांनी तुफान लाठीमार केला. त्यात थोर पंजाबी नेते लाला लजपतराय हे जबर जखमी झाले व त्यातच १७ नोव्हेंबर १९२८ रोजी मरण पावले. सारा देश हळहळला. या हत्येचा बदला घेण्याचा निर्धार करून ब्रिटिश अधिकारी स्कॉटला ठार मारण्याची कामगिरी चंद्रशेखर आझाद, राजगुरू, भगतसिंग व जयगोपाल यांच्यावर सोपवण्यात आली.

१७ डिसेंबर १९२८ रोजी लाहोर येथे पोलीस कचेरीतून इंग्रज अधिकारी बाहेर पडला, तसा त्याचा पाठलाग करून राजगुरूंनी गोळ्या झाडल्या. पाठोपाठ भगतसिंगांनीही गोळ्या झाडल्या. मारला गेलेला ब्रिटिश अधिकारी स्कॉट नसून त्याचा सहायक 'सॉंडर्स' होता.

हत्येच्या या घटनेनंतर चंद्रशेखर आझाद व राजगुरू दोन वर्षांपर्यंत भूमिगत होते. भगतसिंगांसह अनेक क्रांतिकारकांना अटक करण्यात येऊन त्या सर्वांवर खुनाचा खटला भरण्यात आला. तो कित्येक दिवस चालला. चंद्रशेखर आझाद मात्र शेवटपर्यंत पोलिसांच्या हाती लागले नाहीत. पुढे अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्ये पोलिसांच्या चकमकीत ते ठार झाले.

दि. ३० सप्टेंबर १९२९ रोजी राजगुरूंना पुण्यात अटक झाली. खटल्याच्या अखेरीस भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. 'इन्किलाब झिंदाबाद ! इन्किलाब झिंदाबाद !' अशी घोषणा देत तिन्ही क्रांतिकारक हसत हसत फासावर चढले. दि. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना लाहोर तुरुंगात सायंकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी फाशी देण्यात आले. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचा अंत्यविधी फिरोजपूरजवळ (पंजाब) सतलज नदीच्या काठी त्याच रात्री करण्यात आला. फिरोजपूर (पंजाब) येथे भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांची समाधी आहे.

सरदार भगतसिंगचा जन्म पंजाबातील बंग (सध्या हे गाव पाकिस्तानात आहे) या गावी सन १९०७ साली एका क्रांतिकारी कुटुंबात झाला. वडील किशनसिंग व चुलते स्वर्णसिंग - दोघांनाही देशासाठी तुरुंगात जावे लागले असल्याने भगतसिंगांना देशभक्तीचे बाळकडू कुटुंबातून मिळाले होते. त्यांचे प्रारंभीचे शिक्षण बंग या जन्मगावी झाले. उच्च शिक्षण लाहोर येथे दयानंद अँग्लो-वेदिक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


भगतसिंग

महाविद्यालय व नॅशनल कॉलेज येथे झाले. विद्यार्थिदशेत जयचंद विद्यालंकार व भाई परमानंद या शिक्षकांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. पदवी मिळवून ते घरी परतले.

कानपूरला जाऊन 'प्रताप' वृत्तपत्रात त्यांनी बलवंतसिंग या नावाने क्रांतिकारी लेखन व कार्यही सुरू केले. पोलिसांना त्यांच्या गुप्त हालचालींचा सुगावा लागताच कानपूर सोडून भगतसिंगांनी दिल्ली गाठली. लाहोरप्रमाणे दिल्ली हे देखील भारतीयांच्या असंतोषाचे दुसरे केंद्र झालेले होते. दिल्लीच्या 'अर्जुन' साप्ताहिकात बलवंतसिंग याच नावाने ते काम करू लागले. तिथेही पोलिसांची पाळत वाढली, तेव्हा ते लाहोरला आले व मुंडण करून भगतसिंग या नावाने वावरू लागले.


राजगुरू

शिवराम हरी राजगुरू यांचा जन्म महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील खेड येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. प्राथमिक शिक्षणानंतर ते विदर्भाची सांस्कृतिक राजधानी अमरावती येथे गेले. तेथील हनुमान आखाड्याच्या वातावरणात त्यांना देशभक्तीची दीक्षा मिळाली. पुढे संस्कृतच्या अध्ययनासाठी ते बनारसला गेले. न्यायशास्त्रातील मध्यमा परीक्षा उत्तीर्ण झाले. त्याच वेळी इंग्रजी, कन्नड, मल्याळम, हिंदी व उर्दू याही भाषा त्यांनी चांगल्या अवगत केल्या. काही काळ ते 'काँग्रेस सेवादला'त देखील होते, मात्र बनारसच्या त्या वास्तव्यात चंद्रशेखर आझाद, सचिंद्रनाथ संन्याल आदी क्रांतिनेत्यांशी त्यांची ओळख झाली व त्यांच्या 'हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मी' मध्ये दाखल होऊन राजगुरूंनी 'रघुनाथ' या टोपणनावाने उत्तर भारतात उसळलेल्या क्रांतिकार्यात सक्रिय सहभाग घेतला. त्याच सुमारास त्यांची भगतसिंग, जतिनदास, सुखदेव आदी पंजाबी क्रांतिनेत्यांशी मैत्री झाली.


सुखदेव

सुखदेव यांचे संपूर्ण नाव सुखदेव रामलाल थापर. आईचे नाव शल्लीदेवी असे होते. सुखदेव यांचा जन्म १५ मे १९०७ रोजी लुधियानातील चौराबाजार येथे झाला. या ठिकाणाला 'नऊघर' असेही म्हणतात. त्यांनी पंजाबमध्ये क्रांतिकारकांची संघटना स्थापन केली. किंग जॉर्जच्या विरोधात गुप्त मसलतीच्या योजनेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांना धमकावले. त्यामुळे ब्रिटिश सरकार विरुद्ध सुखदेव अशी स्थिती निर्माण झाली.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सुखदेवांनी ल्यालपूर (पंजाब) येथे १९२६ पासून तरुणांना एकत्र जमवण्यास सुरुवात केली. 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' नावाची नवीन देशव्यापी संघटना उभारण्याचे ठरले. भारताला ब्रिटिशांच्या शोषणातून मुक्त करणे, हे या संघटनेचे उद्दिष्ट होते. सामाजिक न्यायावर व समतेवर आधारित समाज निर्माण करणे, हे त्यांचे ध्येय होते. केंद्रीय समितीत सुखदेव व भगतसिंग हे पंजाबतर्फे होते. यात शिववमी, चंद्रशेखर आझाद आणि कुंदनलाल हे विद्यार्थीही होते.

लाहोरच्या नॅशनल कॉलेजमधील अभ्यासिकेत सुखदेव यांनी भारताचा इतिहास, रशियन राज्यक्रांती या विषयांचा चिकित्सकपणे अभ्यास केला. जागतिक पातळीवरील क्रांतिकारक साहित्याचे विविध दृष्टिकोन त्यांनी अभ्यासले. कॉम्रेड रामचंद्र, भगतसिंग आणि भगवतीचरण व्होरा यांच्या मदतीने त्यांनी 'नौजवान भारत सभा' ही संघटना लाहोर येथे स्थापन केली. या संघटनेचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरवण्यात आले – स्वातंत्र्यलढ्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करणे; तर्कसंगत वैज्ञानिक दृष्टीचा अवलंब करणे; जातीयतेविरुद्ध लढणे व अस्पृश्यतेची प्रथा बंद करणे. या कार्यक्रमात त्यांनी सक्रिय भाग घेतला.

१९२९ मध्ये लाहोर खटल्याबद्दल तुरुंगात असताना त्यांनी कैद्यांना मिळणाऱ्या अमानुष वागणुकीबद्दल उपोषण केले. सुखदेव यांना लाहोर खटल्यात माफीचा साक्षीदार होण्याचे सुचवण्यात आले; पण त्यांनी ते बाणेदारपणे नाकारले. या आणि अशा अनेक प्रसंगांतून सुखदेव यांचे अतुलनीय धैर्य, प्रखर देशभक्ती आणि त्यागी वृत्ती यांचा प्रत्यय येतो. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ लुधियाना येथील शाळेस सुखदेव यांचे नाव देण्यात आले आहे.

भारत-पाकिस्तान फाळणीनंतर हुसेनीवाला हा भाग पाकिस्तानात गेला होता; पण भारत सरकारने बदली जमीन देऊन तो भाग मिळवला. सन १९६८ मध्ये भारत सरकारतर्फे तेथे भगतसिंगांचे भव्य स्मारक उभारले गेले. त्या वेळी भगतसिंग यांच्या वृद्ध माता विद्यावती उपस्थित होत्या.

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या स्मरणार्थ 'खेड' या त्यांच्या जन्मगावाचे नामांतर 'राजगुरूनगर' असे करण्यात आले आहे. जन्मस्थळी त्यांचे स्मारकही आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून प्राणांची आहुती देणाऱ्या या क्रांतिकारक हुतात्म्यांचे नाव स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अजरामर झाले.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लाहोरच्या तुरुंगातले तीन क्रांतिवीर कोणत्या घोषणा देत होते ?
(आ) १९२८ साली लाहोरमध्ये कशाच्या विरोधात निदर्शने झाली ?
(इ) भगतसिंगांनी कोणकोणत्या महाविद्यालयांत उच्च शिक्षण घेतले ?
(ई) ब्रिटिश सरकारने सुखदेव यांना कशामुळे धमकावले ?
(उ) कोणाकोणाच्या मदतीने सुखदेवांनी 'नौजवान भारत सभा' स्थापन केली ?





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**प्र. २. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पोलिसांच्या हाती सापडू नये म्हणून भगतसिंगांनी काय काय केले ?

(आ) 'नौजवान भारत सभा' या संघटनेचे कार्यक्रम कोणकोणते होते ?

(इ) बनारसच्या वास्तव्यात राजगुरू यांनी काय काय केले ?

**प्र. ३. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) राजगुरू | (अ) चौराबाजार |
| (२) भगतसिंग | (आ) कानपूर |
| (३) सुखदेव | (इ) खेड |
| (४) प्रताप वृत्तपत्र | (ई) बंग |

**प्र. ४. खालील उत्तरे येतील असे योग्य प्रश्न तयार करा. एकाच उत्तरासाठी एकापेक्षा जास्त प्रश्न तयार होऊ शकतात.**

(अ) लाहोरप्रमाणे दिल्ली हेदेखील भारतीयांच्या असंतोषाचे दुसरे केंद्र झाले.

(आ) राजगुरू काही काळ काँग्रेस सेवादलात देखील होते.

(इ) लाहोरमधील लाठीमारात लाला लजपतराय जखमी झाले.

(ई) सुखदेव यांनी 'नौजवान भारत सभा' स्थापन केली.

**प्र. ५. खालील शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) बाळकडू मिळणे.

(आ) सुगावा लागणे.

(इ) पाळत ठेवणे.

(ई) दीक्षा मिळणे.

(उ) निर्धार करणे.

(ऊ) भूमिगत होणे.

**प्र. ६. राजगुरू यांच्या स्मरणार्थ त्यांच्या जन्मगावाचे म्हणजे 'खेड' चे नाव बदलून 'राजगुरूनगर' करण्यात आले आहे. शिक्षकांशी, पालकांशी चर्चा करून तुमच्या माहितीतल्या अशा नावे बदललेल्या गावांची यादी करा.**

**प्र. ७. खालील शब्दांना 'कारक' प्रत्यय लावून शब्द बनवा. त्यांचा अर्थ शोधा. असे आणखी शब्द शोधा व लिहा.**

(अ) अन्याय...........

(आ) बंधन...........

(ई) सुख...........

(इ) अपाय...........



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# २५. संतवाणी

• ऐका. म्हणा. वाचा.



अर्थेविण पाठांतर कासया करावें ।
व्यर्थचि मरावें घोकूनियां ।।
घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहे ।
अर्थरूप राहे होऊनियां ।।
तुका म्हणे ज्याला अर्थीं आहे भेटी ।
नाहीं तरी गोष्टी बोलों नका ।।

**– संत तुकाराम**

ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ।।
नदी डोंगी परी जळ नोहे डोंगे ।
काय भुललासी वरलिया रंगे ।।
चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ।।

**– संत चोखामेळा**




ऐसे केले या गोपाळे । नाही सोवळे ओवळे ।।
काटे केतकीच्या झाडा । आत जन्मला केवडा ।।
फणसाअंगी काटे । आत अमृताचे साठे ।।
नारळ वरुता कठिण । परि अंतरी जीवन ।।
शेख महंमद अविंध । त्याचे हृदयी गोविंद ।।

**– संत शेख महंमद**



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता ४ थी (मराठी माध्यम )

₹ ३९.००

Downloaded from https:// www.studiestoday.com